म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १७९२

# सात शल्यें मनीं '

## गेल्या पन्नास वर्षांतील मराठी साहित्याच्या वाटचालीचें सिंहावलोकन




लेखक

प्रा. ना. सी. फडके

REFBK-0012341

१ रुपया.

३६२५१
निबंध
१।७।६४
१४०३



REFBK-0012341

# ‘हीं सात शल्यें मनीं’

लेखक : प्रा. ना. सी. फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम...३६२५१

● किर्लोस्कर मासिकांचे प्रमुख लेखक व प्रतिभावंत साहित्यिक प्रा. ना.सी. फडके यांना राष्ट्रपतींकडून 'पद्मभूषण' ही पदवी मिळाल्याबद्दल मुंबओी मराठी साहित्य संघातर्फे फेब्रुवारी महिन्यांत त्यांचा सत्कार करण्यांत आला. ह्या सत्काराच्या निमित्ताने केलेल्या भाषणांत गेल्या पन्नास वर्षांतील मराठी साहित्याच्या वाटचालीचें सिंहावलोकन प्रा. फडके यांनी केलें आहे.

त्या विस्तृत भाषणांतील स्वतः प्रा. फडके यांनी संक्षिप्त केलेला महत्त्वाचा भाग किर्लोस्कर मासिकाच्या ॲप्रिल १९६२ अंकांत प्रसिद्ध करण्यांत आला आहेच. तथापि अनेक अभ्यासकांच्या व रसिकांच्या विनंतीवरून तें संपूर्ण भाषण प्रस्तुत पुस्तिकेच्या स्वरूपांत प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

— प्रकाशक

• गेल्या पन्नास वर्षांतील मराठी साहित्याच्या वाटचालीचें सिंहावलोकन

# 'हीं स्वप्नं झाल्यें मनीं'

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे.
२५१२

—प्रा. ना. सी. फडके

पद्मभूषण हा बहुमानाचा किताब मला मिळाल्याबद्दल माझं अभिनंदन करतांना कित्येकांनी अशी सूचना केली, की १९१२ सालीं मीं कथालेखनाला प्रारंभ केला तेव्हापासून चालू घटकेपर्यंत मराठी साहित्याच्या वाटचालीकडे लेखक, संपादक, प्रकाशक अशा विविध नात्यांनी माझं लक्ष आहे; तेव्हा या पन्नास• वर्षांच्या काळाचं सिंहावलोकन करण्यासाठी नजर टाकल्यास माझ्या मनांत कोणतेकोणते विचार येतात ते मीं वाचकांपुढे ठेवले तर त्यांना ते मनोरंजक व अुद्बोधक वाटतील. तरी माझ्या सत्काराच्या निमित्तानं असा अेक लेख मी लिहावा. मित्रांची आणि चाहत्यांची ही सूचना मला स्वीकारावीशी वाटली. त्यांनी सुचविल्या-प्रमाणं लेख लिहिण्याचा प्रयत्न मी करणार आहें.

१९१२ सालच्या अेप्रिल महिन्यांत मीं माझी पहिली कथा लिहिली व ती 'केरळ-कोकिळ' नांवाच्या त्या काळांतल्या अेका नांवाजलेल्या मासिकांत प्रसिद्ध झाली. या गोष्टीला बरोबर पन्नास वर्षं होत आहेत. या दीर्घ• अवधीत लेखक या नात्यानं मीं स्वत: सतत वाटचाल केली आहे. लेखकांच्या चार पिढ्या मीं पाहिल्या आहेत. त्यांतली ज्येष्ठ लेखकांची पिढी काळाच्या पडद्याआड गेली आहे. नंतरच्या — मला समकालीन अशा— लेखकांच्या पिढींतले कांही लेखक कालवश झाले आहेत, परंतु कांही अद्यापि हयात आहेत आणि लिहीत आहेत. त्यानंतरच्या तरुण पिढीचा पराक्रम माझ्या डोळ्यांदेखत घडलेला आहे. याहि पिढीला 'कृतांत-कटका-मलध्वज-जरा दिसों लागली' हें वार्धक्य-चिन्हांचं वर्णन लागू पडूं लागलं आहे. त्या-नंतरची लेखकांची तरुण पिढी चालू घटकेला मला दिसत आहे. अशा प्रकारें चार पिढ्यांचं कर्तृत्व माझ्या परिचयाचं आहे. या पन्नास वर्षांत किती नवीन मासिकाचा जन्म मीं बघितला! त्यांपैकी कितीकांचं मरण मला पाहावं लागलं. वृत्तपत्रांचीं वारशीं आणि वारावीं अशाच प्रकारें माझ्या नजरेसमोर झालीं. कितीक संपादक आणि प्रकाशक नवेनवे संकल्प सोडून पुढं सरसावले. कितीक पराभूत होअून मागं हटले. कितीक नामशेष झाले. मराठी साहित्याला अनुकूल असे काल-खंड मला पाहतां आले, परंतु त्याचप्रमाणं प्रतिकूल कालखंडहि बघावे लागले. अुन्हाळे पाहिले, पावसाळे पाहिले. शिशिर ऋतूतली पडझड पाहिली, साहित्याच्या क्षेत्रांतला वासं-तिक बहरहि पाहण्याचं भाग्य अुपभोगलं. मराठी साहित्यावर संकटं आलीं त्यांचं स्वरूप डोळ्यांनी बघितलं, आणि त्याच-

प्रमाणं मराठीची प्रतिष्ठा राखणाऱ्या आणि वाढविणाऱ्या घटना घडल्या त्याहि पाहिल्या.

सारांश, गेल्या पन्नास वर्षांत मराठी साहित्यानं केलेली वाटचाल आठवून पाहण्याचा जेव्हा मी प्रयत्न करतों तेव्हा रुंद रुपेरी पडद्यावर अेखादा भव्य चित्रपट दिसावा त्याप्रमाणं हर्षखेदाच्या अूर्मि अुत्पन्न करणाऱ्या घटनांनी भरलेला अेक मोठा चित्ताकर्षक असा भव्य चित्रपट मला दिसूं लागतो.

हा चित्रपट पाहतांना पहिला विचार मनांत येतो तो साहजिकच हा, की साऱ्या गोष्टी किती बदलल्या ! मीं क्रिकेटचा पहिला सामना बघितला तेव्हा चांगले मोठाले खेळाडू साधं धोतर नेसून खेळत असत. आज ही गोष्ट सांगूनदेखील खरी वाटणार नाही. जिथं क्रिकेटचा खेळ जन्मला त्या अिंग्लंड देशांत-सुद्धा जुन्या काळांत क्रिकेट खेळणाऱ्यांचे पोशाख फार वेगळे होते. क्रिकेटच्या वस्त्रा-भरणांतच क्रांति झाली, असं नव्हे, तंत्रांत झाली, खेळाच्या स्वरूपांत झाली, डावपेचांत झाली, नियमातदेखील झाली. असाच कांहीसा मूलगामी आणि सर्वगामी बदल मराठी साहित्याच्या क्षेत्रांत गेल्या पन्नास वर्षांत झालेला आहे. अंगरखा, पागोटं आणि पुणेरी जोडा घालणारा अेखादा जुना लेखक अथवा कवि आजच्या साहित्यसृष्टीकडे बघून खचित गोंधळून जाअील. 'ज्या क्षेत्रांत मी माझ्या काळीं वावरलों तें मराठी साहित्याचंच का हें क्षेत्र ?' असा अुद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडेल. आजच्या मराठी कथाकारांच्या व कवींच्या अंगावरील लांडया बाह्यांच्या बुश-कोटाकडे बघून त्याला खचितच अचंबा वाटेल. 'काव्यगायन' अशा सोज्ज्वल नांवानं साजऱ्या होणाऱ्या मैफलीतलं मराठी शायरांचं रान-दांडगं 'काव्याकांडण' अैकून तो जुना लेखक खचित म्हणेल, 'कवितादेवीचे हे हाल बघवत नाहीत ! बरं झालं विद्रूप काव्याचा हा वांगर्डविगा पाहण्याच्या आधीच आमचे डोळे मिटले !'

सारांश, मराठी साहित्यांत अंतर्बाह्य बदल गेल्या पन्नास वर्षांत झालेला दिसतो. साहित्यसेवेमागच्या जुन्या प्रेरणा नाहीशा झाल्या आहेत. त्यांची जागा नव्या प्रेरणांनी घेतली आहेत. साहित्याचे व्यवहार बदलले आहेत. ते बदलल्यामुळं व्यवहाराची रीति आणि नीति पालटली आहे. वाचकांची संख्या तर वाढली आहेच, परंतु शिवाय त्यांची वृत्ति बदलून गेली आहे. मुद्रणकलेची प्रगति झाली आहे. छापील साहित्याचं बाह्य दर्शन अधिका-धिक मनोहर होत चाललं आहे. त्याबरोबरच पूर्वीची स्वस्ताअी आता दंतकथेसारखी वाटूं लागली आहे आणि साहित्य महाग होत चाललं आहे. साहित्यविषयक संघटना करणाऱ्या अनेक संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. त्याबरोबरच या संस्थांच्या परिसरांतच हेव्या-दाव्यांचं, भांडणतंटयांचं राजकारण शिरलेलं दिसत आहे.

लेखक, प्रकाशक, संपादक, वाचक, टीकाकार असे साहित्यातले पांच मुख्य घटक आहेत. साहित्याची वाटचाल कशावर अवलंबून असते, तर या पांच घटकांच्या साहित्यविषयक विचारसरणीवर आणि परस्पर सहकार्यावर. आता आपला देश स्वतंत्र झाल्यानं 'सरकार' हा अेक सहावा घटक निर्माण झाला आहे. मराठी साहित्याचा वर्तमानकाल या सहा घटकांच्या हातून घडत आहे. भविष्यकालहि त्यांच्या हातात आहे.

ज्या काळांत मीं माझी पहिली कथा लिहिली त्या काळांत मराठी साहित्याची स्थिति कशी होती आणि चालू घटकेला ती कशी आहे हें पाहूं लागल्यास चौफेर प्रगतीचं दृश्य दिसतं, आणि अूर समाधानानं भरून येतो. १९१२ सालीं नामवंत लेखक किती होते,

अुदयोन्मुख किती होते, मासिकं किती होतीं, साप्ताहिकं, दैनिकं किती होतीं, मोठे छोटे छापखाने किती होते, वाचक किती होते, आणि आज या सर्वांचा पसारा किती मोठा झाला आहे, या अेकाच गोष्टीकडे नजर टाकली तरी आपल्या प्रगतीची खूण पटायला हरकत नाही. साऱ्यांची संख्या दसपटींनी, वीसपटींनी वाढली आहे.

अेकूण मराठी भाषिक जेमतेम चार कोटि आहेत. यांतले साक्षर किती, त्या साक्षरांतले सुशिक्षित किती, साहित्य वाचणारे किती, विकत घेअून वाचणारे वाचक किती, पक्षपाती गटबाज टीकाकारांच्या मतलबी शेऱ्यांचा आंधळेपणानं स्वीकार न करतां स्वतंत्र वृत्तीनं रसग्रहण करून कोणतं पुस्तक चांगलं कोणतं वाओीट तें ठरविणारे वाचक किती— अशा अुतरत्या भाजणीचा विचार करूं लागल्यास मराठी साहित्याचं जें चित्र आपल्या नजरेपुढं अुभं राहतं तें फारसं अुत्साहवर्धक नाही; कांहीसं अुदासवाणंच आहे. आम्हीं नामवंत लेखकांनी स्वतःच्या प्रसिद्धीच्या अुगाच बढाया मारायच्या. आपण मोठे ख्यातनाम लेखक आहों असा अुगाच भ्रम ठेवायचा. कठोर सत्य आहे तें हें, की आम मराठी जनतेपैकी दोनचार टक्के लोकांपर्यंतदेखील आमचं साहित्य पोचलेलं नसतं. तें नांवाजलेलं असण्याची गोष्ट तर सोडूनच द्या!

परंतु हा अुदासवाणा विचार वगळून बोलायचं तर असं म्हणतां येअील, की गेल्या पन्नास वर्षांत मराठी साहित्याचा 'छापील संसार' खूपच वाढला आहे. लिहिणारे, लेख मागणारे, ते छापणारे, विक्रय करणारे, वाचणारे, टीका करणारे— सगळ्यांची संख्या वाढली आहे. बेसुमार वाढली आहे असं कधीकधी म्हटलं जातं अितकी वाढली आहे. प्रत्यक्ष लिहिणारांची संख्या वाढली नसेल अितकी आमच्या लिहिण्यांत अमुक गुण आहेत असं स्वमुखानं सांगून साहित्यांत क्रांति घडवून आणल्याचा दावा करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. दैनिकं, साप्ताहिकं, मासिकं, प्रकाशनसंस्था साऱ्यांच्या संख्येंत वाढ झाली आहे आणि जाहिरातबाजीच्या चालू काळाचा महिमा असा, की प्रत्येक जण घराच्या छपरावर चढून आणि आवाज चढवून सांगत आहे, की मराठी साहित्याचं भलं करण्याची चिंता जर कुणी वाहत असेल तर तो फक्त मीच! यामुळं मराठी साहित्याचं क्षेत्र नुसतं गजबजून गेलं आहे.

हा सारा गोंधळ पाहिला आणि गोंगाट अैकला की मराठी साहित्यात चौफेर प्रगति होत आहे याबद्दल शंकेला जागा कुठून राहणार? परंतु कित्येक हजार फुटांच्या अुंचीवरून विमानांतून पाहिलं, की खालचा प्रदेश अेकाच पातळीवर असल्यासारखा आणि नयनमनोहर वाटतो खरा; परंतु खाली अुतरून प्रत्यक्ष त्या प्रदेशात पाअूल टाकलं की त्या प्रदेशातले खाचखळगे, काटे-कुटे, गलिच्छ पाण्याचे ओघळ, पडल्या-झडलेल्या अिमारती डोळ्यांना दिसूं लागतात. याच न्यायानं चालू घटकेच्या मराठी साहित्याच्या अंगोपांगांचं जवळून निरीक्षण केलं आणि अंतर्मुख बनून विचार केला की अनेक विद्रूप गोष्टीहि दिसूं लागतात. अनेक वैगुण्यं आढळतात. अनेक चिंता अुत्पन्न होतात. असं कां असावं आणि असं कां नसावं अशा दोन्ही प्रकारांचीं शल्यं मनाला टोचूं लागतात. अेका जुन्या कवीनं 'चंद्राला दिवसा प्रकाश नसणें, ये कामिनीला जरा' अशा प्रकारें आपल्या मनांतल्या व्यथा बोलून दाखविल्या आणि 'हीं सात शल्यें मनीं!' असा अुद्‌गार काढला. मराठी साहित्याच्या आजच्या अवस्थेचा सर्वांगीण विचार मी जेव्हा करतों तेव्हा अशींच कांही शल्यं मला जाणवतात. या शल्यांचं विवेचन करणं आणि जिथं शक्य तिथं जे अुपाय मला

सुचतात तें सांगणं, अशा दुहेरी हेतूनं हा लेख मी लिहीत आहे.

कोणत्याहि भाषेंतील साहित्याचा विचार करतांना मुख्यत: तीन गोष्टींचा विचार करायचा असतो. साहित्याचा प्रसार, त्याची प्रगति, आणि त्याची प्रतिष्ठा. लेखकांच्या हातून ज्या साहित्याची निर्मिति होते तें साहित्य समाजाच्या विविध थरातल्या किती व्यक्तींपर्यंत पोचतं हा अेक महत्त्वाचा विचार आहे. साहित्याची अंतर्गत गुणवत्ता आणि विकास हा दुसरा महत्त्वाचा विचार. आणि सामाजिक व्यवहाराच्या बहुविध अंगांत साहित्याचा मान किती राखला जातो हा तिसरा महत्त्वाचा विचार. या तीन दृष्टींनी गेल्या पन्नास वर्षांत मराठी साहित्याची वाटचाल कशी काय झाली आहे तें बघण्यासारखं आहे.

असा अेक काळ होता— जो होता असं सांगितलं तर आज खरंदेखील वाटणार नाही, परंतु होता— की जेव्हा विश्वविद्यालयांत मराठी साहित्याला मानाचं राहूं द्या, नांवाचंदेखील स्थान नव्हतं. पदवी-परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या मराठी-भाषिकाची अेकूण चार वर्षांच्या अभ्यासक्रमांत मायभाषेंतील साहित्याशीं चुकूनदेखील गाठ पडत नव्हती. विश्वविद्यालयीन शिक्षणाला मराठीचा विटाळ होअू देता कामा नये अशा कटाक्षानं मराठी भाषेला दूर ठेवण्यांत येत होतं. मायभाषेचा हा अपमान होता; परंतु तो मुकाट्यानं सहन केला जात होता. पुढं हळहळू या बहिष्काराच्या तटबंदीला लहानलहान भोकं पडली आणि अभ्यासक्रमात मराठीचा प्रवेश झाला. कालान्तरानं मराठी साहित्य हा मुख्य विषय घेअून पदवीचा अभ्यास करतां येअूं लागला. परंतु तरीसुद्धा मायभाषेची प्रतिष्ठा पूर्णत: प्रस्थापित झाली नव्हती. पुणं विद्यापीठ अस्तित्वांत आलं तेव्हा हें समाधान आपल्याला मिळालं. नंतरच्या काळात आणखी विद्यापीठं स्थापन झालीं, होत आहेत, होणार आहेत. मराठीची प्रतिष्ठा खूप वाढली आहे. मराठीचे पदवीधर व मराठीचे प्राध्यापक यांची संख्या आता खूप वाढली आहे. तथापि यासंबंधांत अेक विचित्र शल्य माझ्या मनांत आहे. तें शल्य असं, की ज्या विद्यापीठांत शिक्षणाचं माध्यम मराठी आहे अशा विद्यापीठालाच मराठी विद्यापीठ खऱ्याखुऱ्या अर्थानं म्हणतां येअील, आणि अशा स्वरूपाचं विद्यापीठ अजून तरी अस्तित्वांत आलेलं नाही!

या बाबतींतल्या अडचणी मला माहीत आहेत. त्या अडचणींचा पाढा मीं अनेकदा अैकला आहे. विज्ञान-शास्त्राचे विषय मराठींतून कसे शिकवतां येतील ? मराठी परिभाषा कुठं तयार आहे ? अर्थशास्त्रासारख्या विषयांतलीं अिंग्रजी पुस्तकं विद्यार्थ्यानं न वाचलीं तर त्याचं त्याविषयीचं ज्ञान संकुचित राहणार नाही काय ? आपल्या विद्यापीठांतून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांचा अेकंदर दर्जा खालावणार नाही काय ? अिंग्रजीत तो कच्चा आणि ढिला राहणार नाही काय ? अितर प्रांतांतले पदवीधर मोठमोठ्या नोकऱ्या मिळवतील आणि आपला पदवीधर मागं राहील, असं होणार नाही काय ?

हे सारे सवाल मला माहीत आहेत. अिंग्रजी माध्यमाची जागा मराठीला देअूं नये, निदान घाअीनं देअूं नये, कांही काळ मराठीच्या जोडीला अिंग्रजीचा विकल्प असावा, असं प्रतिपादन करणाऱ्यांचा दृष्टिकोन मला समजतो. ते जी प्रमाणं पुढं मांडतात त्यांतला ग्राह्यांश मला कळतो आणि तरीदेखील मी म्हणतों, की मराठीची प्रतिष्ठा शिक्षणक्षेत्रांत केव्हा सिद्ध होअील, तर जिथं सर्व विषय फक्त मराठींतूनच शिकवले जातात, परीक्षेच्या अुत्तरपत्रिका फक्त मराठींतूनच लिहिल्या जातात, असं विद्यापीठ अस्तित्वांत येअील तेव्हा ! या बावतींत ज्या अडचणींचा पाढा वाचला

जातो त्या अनिवार्य नाहीत. सर्व विषय मराठींतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचं अिंग्रजीचं ज्ञान पक्कं व विस्तृत असावं, जे विषय तो मराठींतून शिकला त्या विषयांतले अिंग्रजी ग्रंथ खाजगी रीतीनं वाचण्याचं सामर्थ्य त्याला यावं, अशी अभ्यासक्रमाची आखणी खचित करतां येअील. मराठी परिभाषा आज तयार नसली तरी प्रामाणिक अिच्छा असेल तर ती तयार करतां येअील.

अेक वेळ फक्त अिंग्रजी माध्यमाची व्यवस्था बरी म्हणतां येअील, परंतु मराठी आणि अिंग्रजीदेखील असा जो जोड-कारभार सध्या चालला आहे तो म्हणजे अेक विलक्षण हास्यास्पद गोंधळ आहे. प्राध्यापक म्हणे पहिलीं वीस मिनिटं मराठींत बोलतो व नंतर त्याचीच पुनरावृत्ति अिंग्रजींत करतो. परिणाम असा होतो, की पुनरुक्तींत दुप्पट वेळ जातो आणि अभ्यासक्रम वर्षअखेरीस पूर्ण होत नाही. माध्यमाबाबतचं हें 'द्वैभाषिक' म्हणजे मूर्खपणाचा अेक अजब मासला आहे. माझं म्हणणं असं, की मराठीच्या सामर्थ्यावर तुमचा विश्वास नसेल तर तसं स्पष्ट बोला. मराठी माध्यम काढून टाका. फक्त अिंग्रजी माध्यम असावं असं छातीठोकपणें म्हणा! दोन डगरींवर हात ठेवण्याचा हा भोंगळपणा ताबडतोब बंद झाला पाहिजे.

मराठी भाषेला शिक्षणाचं माध्यम होण्याचं सामर्थ्य प्राप्त व्हावयास अवकाश लागेल आणि तोंपर्यंत केवळ मराठी माध्यम न ठेवता अिंग्रजी माध्यमाचा विकल्प असलेला बरा, ही विचारसरणी वरवर दिसायला कितीहि मोज्ज्वळ दिसत असली तरी ती घातुक आहे. कारण जोंपर्यंत अिंग्रजीचा विकल्प तुम्ही ठेवाल तोंपर्यंत मराठी भाषेचं सामर्थ्य वाढविण्याचे निकराचे प्रयत्न होणारच नाहीत मराठीचा आजचा दुबळेपणा कधी संपणारच नाही. आणि माध्यमाचं हास्यास्पद द्वैभाषिक सतत नांदत राहील. अिंग्रजी माध्यमाचा वापर कधी संपणार नाही. मराठी माध्यमाची अंमलबजावणी कधीच होणार नाही.मी तर म्हणतों, की दोन माध्यमं ठेवण्यापेक्षा 'मराठी मुळी नकोच, फक्त अिंग्रजी असू द्या,' असं म्हणाल तर कांही बिघडणार नाही. सध्याच्या गुळ-मुळीत सौभाग्यापेक्षा मराठी माध्यमाच्या हकालपट्टीचं वैधव्य परवडलं!

यासाठी शिक्षणक्षेत्रांतील मराठीची प्रतिष्ठा खरोखर राखावयची असेल तर धडाडीनं असं म्हटलं पाहिजे, की अेकंदर सर्व शिक्षणाचं माध्यम मराठीच मानलं गेलं पाहिजे. या बाबतींत काय अडचणी असतील त्या आम्ही सोडवूं. काय दुष्परिणाम व्हायचे असतील ते होऊं द्या. अेकदा बघूया तरी केवळ मराठी माध्यमाचा प्रयोग यशस्वी होतो की नाही तें. मराठीच्या अभिमान्यांनी अेवढी अुमेद कां बाळगू नये? मायभाषेच्या सामर्थ्याविषयी येवढा आत्मविश्वास कां ठेवू नये?

माझ्या या प्रतिपादनांत अेक प्रकारच्या हटवादाचा ध्वनि कदाचित् असेल. परंतु त्याचं कारण असं, की मराठी भाषेच्या सामर्थ्याविषयी माझा जो विश्वास आहे तो अमर्याद आहे आणि साहित्यिकांनी योग्य ते यत्न केल्यास तें सामर्थ्य हवं तेवढं वाढेल अशी माझी श्रद्धा आहे. माझ्या मायभाषेंतून ज्याबद्दल लिहितां येत नाही असा विषय असू शकत नाही या प्रतिज्ञेनं क्रिकेट-टेनिससारखे खेळ, कुस्ती—नृत्य-संगीत अित्यादि जे विषय पूर्वी ललित साहित्याच्या कक्षेबाहेरचे समजले जात होते त्यांवर लिहिण्याचा, आणि या सर्व विषयांतला रस वाचकापर्यंत पोचविण्याची शक्ति मराठींत आहे हें सिद्ध करण्याचा अुपक्रम पस्तीस वर्षांपूर्वी 'रत्नाकर' मासिकातून मीं प्रथम केला. आता ते सर्व विषय ललित साहित्याचे सर्वमान्य भाग ठरले आहेत, आणि त्या विषयांना ज्यांची लेखणी सुंदर रीतीनं चालते असे अनेक लेखक

पुढं आले आहेत. मराठीतून ज्याबद्दल सुंदर शैलीनं लिहितां येत नाही असा विषय या जगांत नाही, आणि याच न्यायानं जो मराठींतून शिकविता येणार नाही असाहि विषय असूं शकत नाही, अशा आत्मविश्वासाचं आणि अेक प्रकारच्या जिद्दीचं सामर्थ्य आपण अंगीं आणलं तरच खरंखुरं मराठी विद्यापीठ स्थापन होअील. आणि ते होअील तेव्हाच मराठीची प्रतिष्ठा आपण सांभाळली असं आपल्याला अभिमानानं सांगतां येअील.

प्रतिष्ठेबद्दल लिहितोंच आहें तर आणखी अेक विचार मांडावासा वाटतो; आणखी अेक शल्य बोलून दाखवावंसं वाटतं. आपला हा मायदेश मोठा विचित्र आहे. अनेक धर्म, अनेक पंथ, अनेक भाषा, अशा वैचित्र्यानं तो नटलेला आहे. या वैचित्र्यांतून सौंदर्य निर्माण होतं हें नाकारतां येत नाही. परंतु यातूनच वाद निघतात, भांडणं निघतात, व्यावहारिक अडचणी अुद्भवतात. आपली राष्ट्रभाषा कोणती असावी, राज्यभाषा कोणती असावी, व्यवहार-भाषा कोणती असावी, आंतरप्रांतीय भाषा कोणती असावी अित्यादि प्रश्न सगळ्यांचं समाधान होअील अशा प्रकारें निकालांत काढणं किती कठीण आहे तें आपण पाहतों. परंतु या प्रश्नांची सोडवणूक तुम्ही कशीहि करा, जिच्या बाबतींत तडजोड नाही अशी माझी अेक मागणी आहे, की महाराष्ट्र राज्याचा सर्व अंतर्गत व्यवहार मराठींतून झाला पाहिजे. मराठी-भाषिकांच्या या राज्याचं विधिमंडळ, या राज्याचीं छोटींमोठीं न्यायालयं, सचिवालयं अशा सर्व ठिकाणची व्यवहारभाषा मराठी आणि मराठीच असली पाहिजे! या राज्यांत अितर भाषिक आहेत, अल्पसंख्य म्हणून त्यांचे कांही हक्क आहेत, त्यांच्या सोयी बघाव्याच हव्यात—हें सारं मला माहीत आहे. परंतु राज्याची व्यवहारभाषा म्हणून मराठीला कुर्निसात त्यांनी केलाच पाहिजे. त्यांच्या भिन्न भाषांचा अनादर किंवा हेळसांड आम्ही करणार नाही, परंतु मराठी-भाषिकांच्या राज्यांत तख्तावर बसली पाहिजे मराठीच! हें झाल्याखेरीज मराठीची प्रतिष्ठा पूर्णपणें प्रस्थापित झाल्याचं समाधान आम्हांला घेतां येणार नाही.

प्रतिष्ठेप्रमाणंच प्रसाराचा प्रश्न महत्त्वाचा आहे आणि त्याचा विचार करूं लागलों की खूप समाधानाला जागा दिसते त्याप्रमाणंच असंतोषाच्या अूर्मी मनांत अुठतात. ज्या काळांत मीं माझी पहिली कथा लिहिली त्या काळाच्या मानानं साहित्याच्या प्रसाराचं प्रमाण खूपच वाढलेलं आहे. त्या काळांत टिळकांचा ‘ केसरी ’ म्हणजे महाराष्ट्राचंच नव्हे तर सबंध देशाचं मुखपत्र होतं. असं असूनहि त्या काळांतल्या ‘केसरी’च्या खपाच्या सहज चौपट-पांचपट खप आजघटकेच्या वृत्तपत्राचा असूं शकतो. ‘ मनोरंजन ’ हें त्या काळांतलं अग्रेसर मासिक. परंतु ‘ किर्लोस्कर ’ मासिकाचा आज जो खप आहे तेवढ्या खपाचीं स्वप्नंदेखील ‘ मनोरंजन ’च्या संपादकांनी कधी रचलीं नसतील. ग्रंथांचा खपहि पूर्वीपेक्षा कितीतरी पटींनी आता वाढला आहे. प्रसाराच्या बाबतींत आपल्या साहित्यानं मोठीच मजल मारलेली दिसते.

परंतु ज्याचा संतोष आणि अभिमान वाटावा असा हा प्रसार आहे काय? साहित्याच्या प्रसाराच्या बाबतींत कोणता पल्ला गाठण्याचं ध्येय असावं, तर समाजाच्या सर्व थरांतील सर्व व्यक्तींपर्यंत प्रकाशित साहित्य पोचविण्याचं. हा पल्ला आपण गाठला आहे का? गाठला तर नाहीच, परंतु त्याच्या फारफार अलीकडे आपण रेंगाळत आहोंत. सर्वांत जास्त खपणाऱ्या दैनिकाच्या अेक लक्ष प्रती खपतात असं म्हणतात. ग्रंथांच्या ग्राहकांची व वाचकांची संख्या याहून फारच लहान आहे. परंतु तिच्या अनुषंगानं न बोलतां आपण असं मानूंया, की वृत्तपत्रीय साहित्य का होअीना, तें ज्यांच्यापर्यंत पोचतं असे अेक लक्ष लोक आहेत. चार कोटि मराठी भाषिकांपैकी अेक लक्ष! म्हणजे ज्यांच्यापर्यंत ग्रंथगत साहित्य तर

राहोच,परतु वर्तमानपत्री साहित्यदेखील पोचत नाही, असे किती लोक राहिले ? करा हिशोब आणि सांगा आपल्या साहित्याचा हा प्रसार कितीसा अभिमानास्पद आहे ?

आपला समाज आणि आपलं साहित्य यांमधे केवढं प्रचंड अंतर आहे त्याचा विचार मनांत आला की विषण्णता वाटते, शरम वाटते. हे अंतर कधी नाहीसं होणार, कसं नाहीसं होणार, यासाठी कुणीं कोणते प्रयत्न केले पाहिजेत हे सारे प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत आपल्या साहित्याविषयी निष्ठा आणि जिव्हाळा ज्यांना असेल त्यांनी हे प्रश्न सोडविण्यासाठी झटलं पाहिजे.या बाबतीत राज्य-सरकार आणि केंद्र-सरकार या दोघांनाहि आवाहन केलं पाहिजे.

सरकारचा अुल्लेख मी मुद्दाम करतों आहे. लेखक, वाचक, प्रकाशक वगैरे साहित्याच्या व्यवहाराला बरं-वाओट स्वरूप देणारे जे नित्याचे घटक त्यांत आता आपल्या स्वातंत्र्याच्या काळांत 'सरकार' या नव्या घटकाची भर पडली आहे. अितकंच नव्हे तर या घटकाचा प्रभावीपणा सर्वांत अधिक जरी नसला तरी फार मोठा मानावाच लागेल. लोककल्याणाच्या प्रतिज्ञेनं राज्यकारभार हाकणाऱ्या आपल्या सरकारनं नाटचसंगीतासारख्या कलांप्रमाणंच साहित्याच्या अुन्नतीसाठीहि प्रयत्न करण्याची तयारी दाखवावी हें क्रमप्राप्तच आहे. मराठी साहित्याच्या प्रसारांत जो अुणेपणा दिसतो तो दूर करण्यासाठी सरकारी प्रयत्नांची शिकस्त झाली पाहिजे असं लोकांना वाटणं साहजिक आहे. बहुजनसमाज आणि मराठी साहित्य यांतलं प्रचंड अंतर भरून काढण्यासाठी सरकारला पुष्कळच गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. साक्षरता-प्रसाराच्या मोहिमेसारख्या कांही योजना सरकारच्या प्रत्यक्ष प्रोत्साहनानं चाललेल्या दिसतातहि. याबद्दल सरकारला धन्यवाद द्यावे लागतील. परंतु याखेरीज अनेक गोष्टी अशा आहेत, की त्यायोगें मराठी साहित्याचा प्रसार अवश्य तो पल्ला गाठील, आणि या गोष्टी झाल्यावांचून सरकारनं साहित्याविषयीचं आपलं कर्तव्य पूर्णपणें बजावलं असं म्हणतां येणार नाही.

रशिया, चीन, अमेरिका, यांसारख्या देशांचीं सरकारं आपापल्या साहित्याच्या प्रसारासाठी केवढा प्रचंड अुद्योग करताहेत तें बघा; म्हणजे तुलनेच्या दृष्टीनं या बाबतींत आपलं सरकार किती मागं आहे तें लक्षांत येअील. मोठयाछोटया शहरांतल्या पुस्तकांच्या दुकाना-दुकानांत रशियन साहित्यांतल्या गाजलेल्या ग्रंथांचीं अिंग्रजी भाषांतरं— सुंदर छपाअीचीं, सुंदर बांधणीचीं, अवघ्या दीड-दोन रुपायांत तुम्हांला मिळतील. रशियन जुन्या-नव्या चित्रकलेच्या नमुन्यांचे सुबक सुंदर संग्रह असेच अल्प किंमतींत मिळतील. चिनी साहित्य आणि चित्रसंग्रहहि अशाच प्रकारें दुकाना-दुकानांत विक्रीस ठेवलेले आढळतील. अमेरिकन पुस्तकांचे आणि मासिकांचे ढीगच्या ढीग तुम्हांला आढळतील. या देशांच्या माहिती आणि प्रचारखात्यांनी चालविलेलीं मासिकं तुमच्या घरीं मोफत येतील. नुसतीं मासिकंच नव्हे, तर परोपरीच्या पुस्तिका आणि त्या त्या देशांच्या थोर नेत्यांचीं चरित्रंदेखील. जगांतल्या सर्व भाषिकांच्या हातीं आपलं साहित्य जावं म्हणून रशिया, चीन, अमेरिका या देशांनी जो प्रचंड खटाटोप चालविला आहे तो पाहून मन थक्क होअून जातं. या खटाटोपामागं तुमच्या-आमच्या स्वयंपाकघरांमध्ये आपापलं राजकीय तत्त्वज्ञान पोचविण्याचा या देशांतल्या सरकारांचा डाव अुघडच आहे. परंतु स्वतःच्या राजकीय मतलबासाठी का होअीना, आपापल्या देशाच्या साहित्याचा प्रसार जगाच्या कानाकोपऱ्यांत व्हावा यासाठी तीं तीं सरकारं काय करून राहिलीं आहेत तें बघितलं की मनांत येतं, आमच्या मराठी साहित्याच्या वांटचाला अशा प्रकारचा सरकारी प्रयत्न केव्हा येणार ?

अशा प्रकारचा चौफेर प्रसार तर राहोच, परंतु निदान चार कोटि मराठी भाषिकांपर्यंत लेखकांनी निर्माण केलेलं साहित्य पोचावं यासाठी आमचं सरकार काय करीत आहे, असा सवाल टाकण्यासारखी परिस्थिति आहे. पूर्वीच्या पारतंत्र्याच्या काळांत ज्याचं स्वप्नदेखील पडण्यासारखं नव्हतं असं सरकारी अुत्तेजन साहित्याला आज मिळत आहे ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. परंतु सरकार जें कांही करीत आहे तें पुरेसं आहे काय? चार साहित्यिकांना पारितोषिकं दिलीं, पदव्या दिल्या, मानधन दिलं म्हणजे सरकारचं कर्तव्य संपलं काय? हे सारे अुपक्रम स्तुत्य खरे, परंतु साहित्याच्या प्रसाराला त्यांचा कितीसा हातभार लागतो? बहुजनसमाज आणि साहित्य यांच्यांतील मोठ्या अंतराचा जो मुख्य प्रश्न तो या अुपक्रमांनी कितीसा सुटतो?

लेखकानं निर्माण केलेलं साहित्य वाचकांच्या हातीं पडण्यापूर्वी अनेक गोष्टी घडावयाच्या असतात. त्याचं मुद्रण व्हावयाचं असतं, ग्रंथरूपानं तें तयार व्हावयाचं असतं, नंतर टपालांतून वाचकांपर्यंत त्याची वाटचाल व्हायची असते. या गोष्टी अगदी कमींत कमी खर्चांत झाल्या तरच साहित्याचं चलन-वलन सुकर होअील, आणि प्रसार वेगानं होअील. दोनशे पानांची कादंबरी वास्तविक दीड-दोन रुपयांत मिळायला हवी. परंतु आज घटकेला सहा रुपयांच्या खाली ती मिळत नाही. कागद, छपाअीची शाअी, खिळे-जुळाऱ्यांची मजुरी, छपाअीचे व बांधणीचे दर— साऱ्याच गोष्टी अितक्या महागल्या आहेत, की लेखक, प्रकाशक, संपादक, विक्रेता यांच्या प्राप्तीचा वांटा अेकंदर विक्रीतून सुटावा यासाठी कमी किंमतींत पुस्तक देतांच येत नाही. या महर्घतेनं साहित्याच्या प्रसाराला मोठाच पायबंद घातला आहे. त्यांतच काळ्या बाजाराची भर! साहित्य स्वस्त नाही म्हणून त्याचा प्रसार होत नाही, पुस्तकं झपाट्यानं खपत नाहीत म्हणून स्वस्तांत देतां येत नाहीत— या दुष्ट चक्रांतून साहित्य सुटायचं असेल तर सरकारी शक्तीच मदतीला धावून यायला हवी.

कागदाच्या काळ्या बाजाराचं निर्मूलन तावडतोब कठोरपणानं झालं पाहिजे. हवा त्याला हवा तेवढा कागद स्वस्त दरांत मिळण्याची व्यवस्था सरकारनं केली पाहिजे. आणि शिवाय टपालाच्या हशीलाचे दर अगदी नाममात्र असतील अशी सवलत मिळाली पाहिजे. या बाबतींतल्या अडचणी आम्हांला सांगण्यांत अर्थ नाही. कारण साहित्याचा प्रसार करण्याचं आपलं कर्तव्य साऱ्या अडचणींतून मार्ग काढून सरकारला बजावायचं आहे की नाही असाच आमचा सवाल आहे!

निवडक लेखकांना सरकारकडून पुरस्कार मिळतो, पारितोषिकं मिळतात हें सर्व ठीक आहे; परंतु ज्या प्रश्नाला सरकारनं प्रामाणिकपणें तोंड द्यायला हवं तो प्रश्न फार वेगळा आहे. साहित्याची निर्मिति आणि त्याचं चलन-वलन या दोन्ही गोष्टी अुत्तम प्रकारें व्हाव्या यासाठी सामान्य लेखकाचं आयुष्य— लेखक या नात्याचं त्याचं आयुष्य— अत्यंत सुखाचं झालं पाहिजे. यासाठी आमचं सरकार काय करीत आहे? लेखकांच्या अखिल भारतीय परिषदा दिल्लींत भरतात, राष्ट्रपति, अुप-राष्ट्रपति, पंतप्रधान अशी वडी मंडळी अुपस्थित राहतात, 'तुम्हीं अमुक केलं पाहिजे, तमुक केलं पाहिजे' अशा अुपदेशाचे डोस लेखकांना पाजतात, परिषदा संपतात, नेहरू वगैरे बडे लोक आपल्या कामाला जातात, लेखक घरोघर जातात आणि बिचारे असतात तेथेच राहतात! साहित्याचा प्रसार अडलेला, तुंबलेला असतो तसाच राहतो. लेखकाचं आयुष्य दारिद्र्याचं, धडपडीचं, कटकटीचं असतं तसंच राहतं!

संपादकाला किंवा प्रकाशकाला परवडत नाही म्हणून लेखकाला त्याच्या लेखनाबद्दल

मिळणारा मोबदला तुटपुंजा असणार, लेखकाचा संसार गरिबीचाच राहणार, प्रवास करणं, नवे-नवे अनुभव घेणं, अशा गोष्टी त्याला अशक्यच राहणार, आपल्या मर्यादित अनुभवाच्या भांडवलावर तो त्याच त्याच आशयाच्या कथा लिहीत राहणार, त्याच्या साहित्याची झेप खुरटलेलीच राहणार ! आणि वर टीकाकार त्याला अुपदेश करणार— अरे बाबा, तुझ्या मर्यादा अुघड झाल्या ! ही दुरवस्था संपविण्या-साठी सरकारला खचितच पुष्कळ गोष्टी करतां येतील. लोकसभा आणि राज्यसभा यांच्या सभासदांना सबंध देशभर हवा तिकडे हवा तेवढा प्रवास फुकट करतां यावा अशी व्यवस्था सरकारनं केली आहे म्हणे. या सवलतीमुळं हे महाशय देशाचं कोणतं कल्याण साधतात परमेश्वर जाणे ! अुलट अशा कांही सवलती नव्या अुदयोन्मुख साहित्यिकांना दिल्यास त्यांतून कितीतरी हिताच्या गोष्टी खचितच निघतील. माझ्या प्रतिपादनाचा मुख्य रोख असा, की लेखकांमध्ये जे असामान्य वाटतील त्यांचा गौरव केल्यानं जें कांही साधतं त्यापेक्षा सामान्य लेखकाचं आयुष्य सुखाचं व्हावं या-करिता सरकारनं अवश्य त्या योजना अमलांत आणल्यास साहित्याच्या प्रसाराला फार मोठी गति मिळेल.

बहुजनसमाज आणि साहित्य यांतलं अंतर नाहीसं करण्यासाठी सरकारनं कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत त्याचा विचार करण्याच्या भरांत स्वतः साहित्यिकांनी काय केलं पाहिजे हा महत्त्वाचा प्रश्न आपल्याला विसरतां येणार नाही. 'लोक-साहित्य' या शब्दाचा वापर आपण पुष्कळ करतों. परंतु या संबंधांत अनेक भोंगळ कल्पना आपण अुराशीं धरल्या आहेत. त्या टाकल्या-वांचून मराठीच्या क्षेत्रांत 'लोकसाहित्या'ची सिद्धता व्हायची नाही. श्रीमंत अगर मध्यम वर्गीय लोकांच्या जीवनाच्या चित्रणांतच कथा-साहित्यानं घोटाळत राहूं नये, या जीवनाच्या कक्षेबाहेर पुष्कळ सामाजिक जीवन आहे, तें कथाविषय होण्याच्या योग्यतेचं आहे, खालच्या वर्गांतील स्त्रीपुरुषांच्या सुखदुःखांचीं प्रतिबिंबं साहित्यांत दिसावयास हवीं, या साऱ्या गोष्टी अविवाद्य आहेत. परंतु त्यातून अेक भ्रामक सिद्धांत काढण्यांत येतो तो विवाद्यच नव्हे तर दिशाभूल करणारा आहे. जे खालच्या वर्गा-विषयीचं असेल तेंच तेवढं 'लोकसाहित्य' अशी साहित्यिकांनी आणि टीकाकारांनी जी समजूत करून घेतली आहे ती बिलकुल समर्थनीय नाही. मराठी साहित्य खऱ्याखुऱ्या अर्थानं लोक-साहित्य झालं पाहिजे याबद्दल वाद नाही. परंतु शेतकरी आणि कामकरी यांच्याविषयीच्या कथा तेवढ्याच 'लोकसाहित्य' असं कां म्हणा-यचं ? श्रीमंत आणि मध्यमवर्ग हे काय समाजाचे घटक नाहीत ? हे काय 'लोक' नाहीत ? मध्यंतरीं अेकदा ग्रामीण काव्याची लाट आली होती ती आता ओसरली आहे; ओसर-ण्याच्या लायकीचीच ती होती. सध्या ग्रामीण कथा-साहित्याची लाट आलेली दिसते; ती देखील हळूहळू ओसरण्याचीं चिन्हं दिसूं लागलीं आहेत. अस्सलापेक्षा नक्कल वाढली की असं व्हायचंच आणि शिवाय ग्रामीण कथेच्या अट्टाहासाच्या मागची भूमिका टिकाअू नाही.

साळी, माळी, कोष्टी, सुतार, धनगर, चांभार या लोकांना आपापल्या जीवनाचं दर्शन कथा-कादंबऱ्यांतून घडलं पाहिजे हे म्हणणं बरोबर आहे. वास्तवतेच्या दृष्टीनं तें रास्त आहे. कथा-साहित्याचा अेक प्रकार म्हणून ग्रामीण कथेला निश्चित स्थान आहे. परंतु याचा अर्थ खचितच असा नव्हे, की लोकसाहित्याची पदवी फक्त ग्रामीण कथांनाच देतां येअील. वरच्या वर्गासंबंधीचं कथासाहित्य खालच्या दर्जाचं आणि खालच्या वर्गासंबंधीचं साहित्य मात्र— तें कितीहि रटाळ असलं तरी— वरच्या दर्जाचं, असा अेक विचित्र संकेत निर्माण झालेला दिसतो. हा संकेत बिनबुडाचा आहे, घातुक आहे. लोकसाहित्याची सिद्धता होते ती त्याच्या विवक्षित विषयामुळं नव्हे.

अेके काळीं आपल्या देशाच्या राजकार-णाचा लक्ष्यबिंदु श्रीमंत आणि मध्यमवर्ग होता,

तो पुढे पालटला, बहुजनसमाजासाठी राजकारण होअूं लागलं, लोकांनी लोकांसाठी चालविलेलं लोकांचं राज्य अशा प्रकारचं ध्येय नजरेसमोर ठेवून आपण स्वातंत्र्य मिळविलं. लक्ष्यबिंदूचा असाच कांहीसा बदल साहित्याच्या क्षेत्रांतहि झालेला दिसला तर त्याचं आश्चर्य मानण्याचं कारण नाही. राजकारणांत ज्याप्रमाणं लोकशाही प्रस्थापित करावयास हवी त्याचप्रमाणं साहित्यांतहि लोकशाहीचा अंमल झाला पाहिजे, हा आग्रह रास्त आहे. नव्या काळाबरोबर साहित्यानं पाअूल टाकलं असं होण्यासाठी साहित्याला लोकसाहित्याचं स्वरूप आलंच पाहिजे. 'लोकांनी, लोकांसाठी लिहिलेलं लोकांचं साहित्य हवं' अशी घोषणा नव्या काळाला साजेशीच म्हणावी लागेल.

परंतु या घोषणेंतले शब्द निसरडे आहेत, फसवे आहेत. ते तपासून घेतले, योग्य अर्थानं वापरले तर ठीक; नाहीतर ते अनर्थ करतील. अेखाद्या मंत्राचा चुकीचा अुच्चार केल्यास अिष्टकार्य सिद्ध होण्याअैवजी भलताच परिणाम होतो, मंत्र अंगावर अुलटतो म्हणतात, तशांतली या घोषणेची स्थिति आहे. लोकांसाठी लिहिलेलं साहित्य, लोकांनी लिहिलेलं साहित्य, लोकांचं साहित्य यांपैकी अेकेक कल्पना योग्य अर्थानं घेतली तर हिताची ठरेल. न घेतल्यास त्याचे दुष्परिणाम दिसूं लागतील. दिसूं लागतील असं कशाला, दिसूं लागलेच आहेत!

समाजाच्या खालच्या थरांतल्या लोकांच्या जीवनाचे सध्या जे प्रमाणाबाहेर लाड चालले आहेत तो दुष्परिणाम नाही तर काय सुपरिणाम म्हणतां येअील? श्रीमंत आणि मध्यम वर्गीयांप्रमणंच समाजांतल्या खालच्या लोकांच्याहि सुखदु:खांना वाचा फोडण्याचं काम साहित्यिकानं केलं पाहिजे--या रास्त कल्पनेला सर्वस्वीं विकृत स्वरूप देअून आपण असं मानण्याच्या धाअीला आलों आहों, कीं कथा, कादंबरी, नाटक यांचं कौतुक केव्हा करायचं, तर त्यांतलीं मुख्य पात्रं श्रमजीवि लोकांतलीं असतील तर! जितकीं अधिक खालच्या वर्गांतलीं तीं असतील तितकीं अधिक चांगलीं! नायक ब्राह्मण असण्यापेक्षा मराठा असेल तर बरा. पण महार, मांग, रामोशी, बेरड अशांपैकी असेल तर फारच बरा. नायक-नायिका निरोगी, सुदृढ प्रकृतीचीं असण्यापेक्षा कुष्ठरोगी असतील तर अधिक बरीं!

श्रमजीवि, अपंग, दलित लोकांविषयी कथासाहित्य असूं नये किंवा असूं शकत नाही, असं मला बिलकुल म्हणायचं नाही. साहित्याच्या विषयाला मर्यादा असत नाही, कुणी ती घालण्याचा प्रयत्न करूं नये, कुणी घातल्यास साहित्यिकांनी ती मानूं नये असं समजणारा आणि या मताचं प्रतिपादन सतत करणारा माणूस मी आहें. ललित साहित्यांत विषयाचं महत्त्व नाही, कलागुणांचं महत्त्व आहे. कलेसाठी कला असं मी म्हणतों त्याचा अर्थ हाच आहे. जो जो अनुभव अंत:करणाला भिडेल त्याचा त्याचा आविष्कार करून त्यांतील रसाचा आस्वाद लोकांना देणं, ही ललित लेखकाची प्रतिज्ञा असते. सारं जग--श्रीमंत-गरीब, सुष्ट-दुष्ट, पवित्र-पापी, ब्राह्मण-क्षत्रिय, शूद्र-चांडाल अशा माणसांच्या सर्वसर्व तऱ्हा साहित्याच्या कक्षेत येतात. तेव्हा ज्या साहित्याला सध्या लोकसाहित्याची पदवी बहाल करण्यांत आली आहे त्या साहित्याचं महत्त्व मी ओळखतों, त्याची आवश्यकता मला पटते. त्या साहित्याविषयी माझ्या मनांत अनादर कसा असेल? भांडण आहे तें ग्रामीण कथासाहित्याबद्दल नव्हे, तर हें साहित्य तेवढंच मोलाचं, आणि तेंच तेवढं 'लोकसाहित्य' या कल्पनेशीं! ही कल्पना तर्कदुष्ट आहे, विचित्र आहे, घातुक आहे. लोकसाहित्य शब्दाचा विपर्यास करणारी आहे.

ज्या साहित्यांत श्रमजीवि लोकांचं जीवन रंगवलेलं आहे त्यांनच बहुजन समाजाला गोडी

वाटण्याची शक्यता आहे, ही समजूतच मुळी खरी नाही. ललित साहित्याकडे माणूस ज्या कारणानं वळतो त्या कारणाच्या अज्ञानावर ही समजूत आधारलेली आहे. खेडूत आयुष्याच्या चित्रणांतच खेडुताचं मन रमेल असं कुणी सांगितलं? श्रीमंतांच्या आणि मध्यम-वर्गीयांच्या जीवनक्रमाबद्दलच्या गोष्टी त्याला वाचाव्याशा वाटणार नाहीत असं कुणी सांगितलं? 'पुन:प्रत्यया'प्रमाणंच नवीननवीन प्रत्ययांसाठी माणूस काव्य, नाटकं वाचतो. परिचिताप्रमाणंच जें अपरिचित– जें कधी न अनुभविलेलं, त्याचीं वर्णनंहि वाचण्याची ओढ माणसाला असतेच. वाचकांचा अनुभव समृद्ध आणि संपन्न करणं हेंच काव्य-नाटकांचं कार्य आहे. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यात शेतकऱ्यांचीं-कामकऱ्यांचीं वर्णनं आहेत काय? या कादंबऱ्या बहुजन समाजांतील आजच्या वाचकांना आवडत नाहीत असं म्हणण्याचं धाडस तुम्ही कराल काय? जिल्ह्याच्या, तालुक्याच्या गावांतील वाचनमंदिरांत कुणाच्या कादंबऱ्यांना वाचकांची जास्त मागणी आहे त्याचा शोध घेतला तर तुमची खात्री पटेल, की ग्रामीण कथा-साहित्य लिहिणाऱ्यांच्या जोडीनं फडके-खांडेकरांच्या कादंबऱ्यांना मागणी आहे. केवळ श्रमजीवि वर्गाबद्दलचं साहित्यच बहुजन समाजाला प्रिय असतं, आणि म्हणून लोकसाहित्य निर्माण करायचं असेल तर ग्रामीण कथांचे कारखाने काढले पाहिजेत, हा विचार किती खुळेपणाचा आहे आणि साहित्यिक मूल्यांची गल्लत करणारा म्हणून किती घातुक आहे तें पाहा.

गंमत अशी, की ग्रामीण कथासाहित्य ग्रामीण जीवनाबद्दल असतं हें खरं, परंतु त्याचं वाचन ग्रामीण जनता करते म्हणतां काय? माडगूळकर, मिरासदार, शंकर पाटील, यांच्या कथा कोण वाचतो आणि चांगल्या ठरवितो? तुमच्या-आमच्यासारखे पांढरपेशे लोकच! रुचिपालट झाल्याचा आनंद आपल्याला मिळतो आणि ग्रामीण साहित्याच्या नव्या प्रकाराचं आपण स्वागत करतों. ग्रामीण काव्याची टूम जेव्हा जोरांत होती तेव्हा 'मैतरणी बिगि बिगि चाल!' ही कविता गाऊन दाखविणारा कवीहि शेतकरी नव्हता, श्रोतेहि शेतकरी नव्हते! पांढरपेशांनीच तीं काव्यं लिहिलीं, पांढरपेशांनीच तीं अैकून टाळ्या वाजविल्या! गिरणी-कामगारांच्या जीवनाविषयी मामा वरेरकरांनी अेक नाटक लिहिलं होतं. परंतु त्या 'सोन्याच्या कळसा'चा अेकसुद्धा प्रयोग गिरणगावांत झाल्याचं माझ्या अैकिवांत नाही. त्याचे प्रयोग होत होते ग्रँटरोडवरच्या बाँबे थिअेटरांतच! आणि ज्यांना बापूराव पेंढारकरांच्या गाण्याची गोडी लागली होती अशा गिरणी मालकशेटांपुढे आणि पांढरपेशांपुढेच!

सारांश, 'लोकसाहित्य' या शब्दाचा आंधळा वापर आपण करीत आहोंत हें बरं नव्हे. असा वापर साहित्याला अुपकारक नसून अपकारक आहे. लोक-साहित्याच्या घोषणेचं स्वागत करतां येअील तें अेकाच अर्थानं, की बहुजन समाजापर्यंत सर्व प्रकारचं साहित्य पोचलं पाहिजे. साहित्याचा आस्वाद घेण्याची पात्रता आणि द्रव्यबळ समाजांतल्या अेकाच विशिष्ट वर्गापुरतं मर्यादित राहता कामा नये. साहित्याच्या आस्वादाचं भांडार सर्वांनाच खुलं असायला हवं. देशाचा कारभार म्हणजे अमुक अेका वर्गाची मिरासदारी असतां कामा नये, सर्व समाजाचा तो अधिकार असावा, या राजकारणांतील आधुनिक कल्पनेच्या चालीवरच लोकसाहित्याची कल्पना निघाली आहे. परंतु तिचा ग्राह्य आणि हितकारक अर्थ येवढाच, की साहित्याचा रसास्वाद कोणत्याहि विशिष्ट वर्गाची मिरासदारी असतां कामा नये; तो आस्वाद सर्वसर्व लोकांना खुला असावयास हवा.

हा विचार प्रथमदर्शनी वाटतो तितका नवीन नाही. जुनाच आहे. अभिमानाची गोष्ट

अशी, की मराठी साहित्याच्या अुगमस्थानींच हा विचार आपल्याला स्पष्ट आढळतो. माधुर्याच्या बाबतींत अमृतालाहि पैजेसाठी जिंकणारी अशीं ' अक्षरं ' ' मेळविण्या'ची प्रतिज्ञा करून गीतेचा अर्थ मराठींत ज्ञानेश्वरांनी सांगितला तो कुणासाठी ? मराठी बहुजनसमाजासाठीच नव्हे काय ? संस्कृत भाषेंतली भगवद्गीता फक्त संस्कृत पंडितांची म्हणजे वरिष्ठ वर्गाची मिरासदारी होती. त्या ग्रंथाचा संदेश आणि सौंदर्य अेकंदर सर्व मराठी समाजाला सांगण्याची ज्ञानेश्वरांची भूमिका नव्हती काय ? लोक-साहित्य निर्माण करण्याचीच ही खटपट नव्हती काय ? त्या काळांत परमार्थविचार हा साहित्याचा हेतु होता. या परमार्थाच्या बाबतींतली मिरासदारी नष्ट करून मराठी समाजाच्या सर्व थरांत घरोघर परमार्थाचं लोण पोचविण्याचं क्रांतिकार्यच ज्ञानेश्वरांनी आणि तुकारामादि संतांनी केलं, नव्हे काय ? **There shall be no privileged classes** – अशीच त्यांची प्रतिज्ञा होती ना !

तेव्हा ' लोकसाहित्य ' या शब्दाचं नवं नाणं आपण आपल्या टांकसाळींतून बाहेर काढलं, असा खोटा भ्रम कुणीहि मनांत ठेवूं नये. साहित्यांतली लोकशाही आम्ही परकीयांपासून शिकणार आहोंत अशांतली गोष्ट मुळीच नाही. आता नव्या काळांत परमार्थाच्या हेतूनं साहित्य लिहिलं जात नाही. आजच्या काळांतला हेतु निराळा आहे. परंतु हेतु बदलला असला तरी ' लोक-साहित्य ' या शब्दांतलं ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेलं मर्मच आपण नजरेसमोर ठेवलं पाहिजे. लोकसाहित्य निर्माण करायचं असेल तर सर्व प्रकारच्या– केवळ ग्रामीण विषयावरच्याच नव्हे, तर सर्व विषयांवरच्या साहित्याचा आस्वाद घेण्याची पात्रता समाजाच्या अुच्च. नीच अशा वर्गांतल्या सर्व लोकांच्या ठिकाणीं यावी यासाठी जे जे प्रयत्न आवश्यक असतील ते ते करायला हवेत.

हे प्रयत्न करतांना मुख्य गोष्ट लक्षांत ठेवायची ती ही, की बहुजन समाजापर्यंत साहित्य पोचावं यासाठी लेखकानं खालच्या पातळीवर जायला हवं असं नव्हे, तर अुलट, रसास्वादाच्या शक्तीच्या बाबतींत बहुजनसमाज वरच्या पातळीवर येअील यासाठीच झटलं पाहिजे. गीतेचा अर्थ बहुजन-समाजापर्यंत पोचविण्याच्या प्रतिज्ञेनं ज्ञानेश्वरी सांगतांना बहुजन समाजाला सहज झेपेल अशा विवेचनाच्या किंवा भाषेच्या पातळीवर ज्ञानेश्वर अुतरले नाहीत. अुच्च दर्जाच्या नवरसात्मक पांडित्यपूर्ण विवेचनाचाच त्यांनी अवलंब केला. अुपमा-अुत्प्रेक्षादि अुत्तमोत्तम अलंकारांनी नटलेली सुंदर नागर भाषाच त्यांनी वापरली. ' आयला ' ' बायला ' असल्या खेडूत वाक्प्रचारांची त्यांना आवश्यकता भासली नाही. आपल्या लिखाणाच्या अुंच पातळीवर बहुजनसमाजाला आपण अुचलून घेअूं, त्याच्या रसास्वादाची शक्ति आपण वाढवूं, त्याची अभिरुचि आपल्या लेखनाचं मर्मग्रहण करण्याअितकी सबल करूं, असा जो आत्मविश्वास ज्ञानेश्वरांनी बाळगला तो आपण लक्षांत ठेवला पाहिजे.

बहुजनसमाजाला आवाहन करायचं असेल तर विषय आणि भाषा यांच्या बाबतींत कथा-साहित्यानं आपला नागरपणा टाकला पाहिजे आणि खेडवळ, रांगडा, आडमुठा गावठीपणा स्वीकारला पाहिजे ही कल्पना किती चुकीची आहे तें आणखी विस्तारानं सांगण्याचं कारण नाही. लोकसाहित्याची सिद्धता अवश्य झाली पाहिजे. लेखक आणि बहुजनसमाज यांतलं अंतर नाहीसं झालं पाहिजे. परंतु तें कमी करण्यासाठी साहित्यि-कांनी खालच्या पातळीवर जायला पाहिजे असं नव्हे, तर बहुजनसमाजाला साक्षर आणि सुसंस्कृत करण्यासाठी झटून, ज्याला विदग्ध साहित्य म्हणतात त्याचा रसास्वाद

ते घेअूं लागतील, या ध्येयानं साहित्यसेवा केली पाहिजे.

मराठी साहित्याची प्रतिष्ठा आणि त्याचा प्रसार यासंबंधीच्या विवेचनानंतर साहित्याच्या प्रगतीसंबंधी विचार करणं प्राप्त आहे. साहित्याची प्रगति झाली पाहिजे याचा अर्थ त्याची गुणवत्ता वाढली पाहिजे. वाचकांचा अनुभव समृद्ध आणि संपन्न करणं हा साऱ्या ललित साहित्याचा हेतु. वाचकांचं अुद्बोधन, वाचकांचं नीतिसंवर्धन, धर्मकारणाचा अथवा समाजकारणाचा प्रचार, सामाजिक सुधारणा, क्रांति, अित्यादि हेतु मनाशीं ठेवून ललित साहित्याची निर्मिति करूंच नये, असं कुणाचंच म्हणणं नाही. माझंदेखील नाही. मी असं म्हणतों असं जे सांगतात ते माझ्या भूमिकेचा विपर्यास करण्याच्या हेतूनं सांगत असतील. अुपदेश, प्रचार, सुधारणा, क्रांति अशा हेतूंच्या पोटतिडिकीनं ज्यांना कथा-कादंबऱ्या लिहायच्या असतील त्यांनी खुशाल लिहाव्या. अशा पोटतिडिकेनं लिहिणारे कादंबरीकार, नाटककार झालेच नाहीत किंवा होणार नाहीत असं भलतं विधान मीं कधीहि केलं नाही. परंतु अेवढं मात्र मी कटाक्षानं सांगत आलों आहे, की अशा लोकांचं जें साहित्य टिकलं आणि अक्षर साहित्यांत जमा झालं तें त्यांतल्या अुपदेशामुळं नव्हे किंवा प्रचारामुळं नव्हे, तर त्यांतल्या अस्सल कलागुणांमुळं. याचा पुरावा म्हणून हवीं तेवढीं अुदाहरणं दाखविनां येतील. अुद्बोधन, प्रचार, अित्यादींवर ललित साहित्यानं बहिष्कार टाकावा असं मला मुळीच सुचवायचं नाही. माझा महत्त्वाचा सिद्धांत आहे तो अेवढाच, की अुद्बोधन, शिक्षण वगैरे हेतु गौण आहेत, आगंतुक आहेत. आगंतुक अशा अर्थानं, की ललित साहित्याच्या सरस-नीरसतेची कसोटी त्यावर अवलंबून नाही. वाचकांचं मनरंजन हीदेखील खरी कसोटी नव्हे. Entertainment आणि Enlightenment असे अिंग्रजींत दोन शब्द आहेत. त्यांचा वापर करून असं म्हणण्यांत येतं, की "The purpose of literature is not to enlighten but to entertain." म्हणजे वाचकाचं अुद्बोधन नव्हे तर मनरंजन करण्याचा ललित साहित्याचा हेतु मानावा. या मताचा पुरस्कार मीं केला आहे. परंतु आताशा मला वाटूं लागलं आहे, की या विधानांतदेखील बदल केला पाहिजे. Entertainment आणि Enlightenment या शब्दांप्रमाणंच Enrichment असा अेक शब्द आहे. त्याचा अुपयोग करून मला असं म्हणावंसं वाटतं, की "**The true purpose of literature is neither enlightenment nor mere entertainment; but the enrichment of the reader's experience.**" म्हणजे ज्यायोगें वाचकाच्या अनुभूतीची विस्तृतता, समृद्धता, संपन्नता वाढेल तें खरं ललित साहित्य. अुत्कट अनुभूतीचा सुंदर आविष्कार हेंच कवितेचं, कादंबरीचं, नाटकाचं खरं अस्सल स्वरूप! लेखकाच्या लिखाणांत त्याच्या अनुभूतीची समृद्धता जितकी प्रकट होअील आणि तिच्या सुंदर आविष्काराचा परिणाम घडून वाचक, श्रोते, प्रेक्षक यांच्या अनुभवाची समृद्धता जितकी वाढेल, तितकी त्या साहित्याची थोरवी समजावी.

हा अविवाद्य सिद्धान्त डोळ्यांपुढं ठेवूनच साहित्याच्या प्रगतीचा म्हणजेच त्याच्या गुणवत्तेच्या वाढीचा विचार करायला हवा. गेल्या पन्नास वर्षांत आपल्या मराठी साहित्याची प्रगति किती झाली, आज घटकेला आपण कोणत्या टप्प्यावर अुभे आहोंत, आजची परिस्थिति कितीशी समाधानकारक आहे कोणत्या नव्या प्रवृत्तीचे प्रवाह आढळतात, त्यांतले कांही भयावह आहेतसे वाटतात तसे ते खरोखरीच आहेत काय, साहित्याच्या प्रगतीच्या

मार्गांतले खरे धोके कोणते आहेत अित्यादि प्रश्नांचा विचार आपण करायला हवा.

मराठी ललित साहित्यांतून आविष्कृत होणाऱ्या अनुभवांचे प्रकार आणि त्यांच्या कक्षा गेल्या पन्नास वर्षांत पुष्कळच वाढल्या आहेत याबद्दल दुमत असण्याचा संभव नाही. साहित्यांतून आविष्कृत होणारे अनुभव परिस्थितीप्रमाणं बदलत असतात. ललित साहित्याला कांही प्रमाणांत वस्तुनिष्ठ स्वरूप असतं हें जरी खरं, तरी त्यांत अखेर अविष्कार होतो लेखकाच्या विविष्ट व्यक्तिगत अनुभवाचाच. हा सर्वस्वीं व्यक्तिगत आणि खाजगी असा जो लेखकाचा अनुभव तो निर्माण होतो कशातून, तर भोवताली जें जें घडतं त्याची लेखकाच्या अंतःकरणावर जी प्रतिक्रिया होते तिच्यांतून. ज्या समाजांत आणि काळांत लेखक राहतो त्याचं रूप बदलत असतं. समाजाची जुनी घडी अुसकटली जाअून नवी घडी घातली जाण्याची क्रिया सतत चालू असते. समाजजीवनाचा हा न्यायच आहे. यामुळं लेखकांची अेकेक पिढी वेगवेगळ्या परिस्थितींत असते आणि त्यांच्या साहित्यांत समाजाच्या भिन्नभिन्न अवस्थांचं प्रतिबिंब पडत असतं. हरिभाअू आपट्यांच्या कादंबऱ्या त्यांतल्या अवीट कलागुणांमुळं चालू घटकेलाहि वाचल्या जातात; परंतु त्या कादंबऱ्यांतून दिसणारी मध्यमवर्गीय मराठी दुनिया काळाच्या ओघाबरोबर वाहून गेलेली आहे, आता प्रत्यक्षांत अुरलेली नाही. देवलांच्या 'शारदा' नाटकांतलं जग आता बदललेलं आहे. अितकं कशाला, 'जादूगार,' 'दौलत' यांसारख्या माझ्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांतून ज्या समाजाचं चित्रण मी केलं तो तरी आता जागेवर कुठं अुरला आहे? माझ्या अलीकडच्या कादंबऱ्यांतून अेक वेगळाच समाज मी चित्रित करीत आहे.

सारांश, स्वतः अनुभवलेल्या किंवा सहानुभूतीच्या शक्तीनं जाणलेल्या अितरांच्या सुख-दुःखांचं वर्णन ललित साहित्यिक करीत असतो हें जसं खरं, त्याचप्रमाणं साहित्यांत आविष्कृत होणारे सुखदुःखांचे अनुभव सारखे बदलत असतात हेंहि खरं. म्हणून मराठी साहित्यांतली गेल्या पन्नास वर्षांतली प्रगति बघितली तर असं दिसून येअील, की कथासाहित्याचे विषय खूपच बदलले. मात्र लेखकांच्या अनुभवाचा निराळेपणा— म्हणजेच साहित्याच्या विषयांचा निराळेपणा अेवढंच चालू घटकेच्या साहित्याचं वैशिष्टच नाही. साहित्याची अेकंदर कक्षा वाढली आहे, झेप वाढली आहे, वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांना साहित्य स्पर्श करूं पाहात आहे— हें आजच्या साहित्याचं खरं महत्त्वाचं वैशिष्टच आहे. सुखदुःखांचा अमुक अेक प्रकार वर्ज्य समजावा, त्याबद्दल लिहूं नये असं मानायला आजचा लेखक तयार नाही. याचा दुहेरी परिणाम होत आहे. अेकीकडे कथासाहित्याचं वैचित्र्य वाढतं आहे, परंतु दुसरीकडे कांही लोकांना चिंता वाटूं लागली आहे, की हे लेखक आणि हे कवि तारतम्याचा, शिष्टसंमत मर्यादेचा कांही विवेक ठेवणार आहेत की नाही?

साहित्याच्या विषयांत आलेल्या विविधतेचं आणि बहुरंगीपणाचं कौतुक करावं की शिष्ट अभिरुचीची मर्यादा ओलांडली जात आहे याची चिंता करावी, अशा संभ्रमांत सामान्य वाचक चालू घटकेला सापडलेला आढळतो. ही चिंता व्यक्त करणारीं माणसं सामाजिक नीतिमत्तेचं नांव घेअून बोलतात, प्रामाणिक संतापानं बोलतात, अुच स्थानावरून आणि अुंच आवाजांत बोलतात. त्यांच्या चिंतेकडे आणि निषेधाकडे दुर्लक्ष करतां येणार नाही. परंतु कांही महत्त्वाचे विचार त्यांच्या निदर्शनाला आणले पाहिजेत असं मला वाटतं.

या चिंताग्रस्त विचारवंतांनी अेक महत्त्वाची गोष्ट विसरूं नये, की पन्नास वर्षांपूर्वीच्या काळांत साहित्य हा अेक 'धर्म' होता, चालू घटकेला तो अेक 'धंदा' झालेला आहे; आणि आपण कितीहि नको म्हटलं तरी भावी काळांत त्याला धंद्याचंच स्वरूप अधिकाधिक येणार आहे. ज्या काळांत मीं माझी पहिली कथा लिहिली त्या काळांत लेखक थोडे होते, संपादक थोडे होते, प्रकाशक थोडे होते, वाचकांची संख्या थोडी होती. त्या मानानं या साऱ्या घटकांची संख्या आज किती फुगलेली आहे. लेखन करणं, प्रकाशन करणं, मासिकाचं संपादन करणं या साऱ्याच गोष्टी पूर्वी केवळ हौसेखातर, केवळ अेक स्वभावधर्म म्हणून केल्या जात होत्या. आज त्यांना धंद्याचं स्वरूप आलं आहे. आपल्या पूर्वीच्या जीवनाची शांत, सुखी, निश्चिन्त, मर्यादित परंतु संतोषपूर्ण तऱ्हा नाहीशी झाली आणि आपल्या जीवनांत अेक प्रकारचा बकालीपणा आला आहे. हा बकालीपणा साहित्याच्या क्षेत्रामधे शिरणं क्रमप्राप्तच म्हणावं लागेल. पन्नास वर्षांपूर्वीची मुंबअी गडप होअून विस्तारानं प्रचंड आणि संस्कृतीनं बकाली अशी नवी मुंबअी निर्माण झालेली दिसते ना? लोकमान्य टिळकांच्या वेळचं पुणं नामशेष होअून आतां धाअीनं धावणारं, अस्वस्थ, असं अेक नवीनच बकाली पुणं शहर अस्तित्वांत आलेलं आपल्याला आढळतं ना? हे बरं की वाअीट या प्रश्नाला मुळी अवकाशच नाही. काळानं आपल्या वांट्याला आणलेली ही अेक घटना आहे. सांडलेल्या दुधासाठी विलाप करीत बसू नये, असं जें अिंग्रजी सुभाषित आहे तें लक्षांत ठेवून आपण वागलं पाहिजे.

तेव्हा साहित्यांत बकालीपणा आलेला आहे तो परिस्थितीचा अटळ परिणाम आहे. या गोष्टीचा विसर करून चालणार नाही. लेखन, प्रकाशन, संपादन अित्यादि साहित्याच्या सर्व अंगांना धंद्याचं स्वरूप— वाटल्यास धंद्याची अवकळा म्हणा— आलेली आहे. याबद्दल अुगीच जीव पाखडण्यांत अर्थ नाही. साहित्य हा अेक प्रकारचा धंदा झाला असल्यामुळं 'जो स्पर्धेत टिकायला लायक तो टिकेल'— Survival of the fittest हा न्याय या क्षेत्रांतहि लागू ठरलेला आहे, आणि ठरणार आहे. समाजांतील कांही लोकांच्या मतानं जें अशिष्ट आहे, अश्लील आहे, ज्याचं वर्णन सहसा कुणी करीत नाही, जें सामान्यत: बहिष्कृत समजलं जातं, त्याच्या वर्णनांत गोडी घेणारे— ते बहिष्कृत मानलं जातं म्हणून अधिकच गोडी घेणारे— पुष्कळ लोक आहेत, आणि या पुष्कळ लोकांची सहसा न भागणारी अिच्छा आपण भागवली तर— आणि तरच!— साहित्यक्षेत्रांतल्या स्पर्धेत आपण टिकूं, अशा मतलबी धोरणानं कांही लेखक आणि संपादक वागत असले तर आजच्या बकाली युगधर्माचा तो अेक भाग आहे. त्याचं स्वागत करावं असं मी सुचवीत नाही; परंतु साहित्यांतला हा बकालीपणा बघून 'आग लागली! धावा धावा!' असं ओरडण्याचं, आता 'मराठी साहित्याचं वाटोळं होणार' म्हणून चिंतायुक्त आक्रोश करण्याचं, या गुन्हेगारांना कोर्टांत खेचा, शिक्षा ठोठावा, साहित्य संमेलनांत निषेधाचे ठराव करा, अशी ललकारी ठोकून आसुडाचे काड्-काड् आवाज करणाऱ्या कडकलक्ष्मीचा अवतार तथाकथित सज्जनांनी आणलाच पाहिजे असं कांही नाही. माझी अशी श्रद्धा आहे, की बकाली साहित्याची निर्मिति कितीहि वाढल्यासारखी दिसली तरी मराठी साहित्याचा गाभा सुरक्षितच आहे, आणि असेल. मराठी-भाषिकांची सात्त्विक अभिरुचि बिघडलेली नाही. अुच्च दर्जाचं साहित्य वाचकांपुढं ठेवण्यांत आपण आळस केला नाही तर त्याचीच बूज वाचकांकडून राखली जाअील. बकाली, घाणेरड्या मासिकांची आज चलती

असल्यासारखी वाटली तरी हा सारा देखावा औट घटकेचा ठरेल. अुच्च अभिरुचीच्या कलात्मक वाङ्मयाचा खुराक मराठी वाचकांना नित्य मिळत राहिला तर कोणतं साहित्य सकस आणि कोणतं निकस तें वाचकांना खचित ठरवितां येअील, आणि सकस साहित्याच्या बाजूनंच त्यांचा अखेरचा कौल पडेल. हॉटेलांतली घाणेरडी मिसळ खाअून जिभेचे भलते तामसी चोचले पुरविण्याची लोकांना कितीहि चटक लागली आणि हॉटेलाच्या गल्ल्यांत पैसे खुळखुळलेले अैकूं आले तरी गृहिणीच्या हातचं साजुक, सात्त्विक अन्न खाण्याचं माणसं सोडीत नाहीत. तेंच आपलं खरं जीवन होय हा विवेक त्यांच्या ठिकाणीं कायमच राहतो.

साहित्याचं हौसेचं किंवा धर्माचं स्वरूप नाहीसं होअून त्याला धंद्याचं स्वरूप आल्यामुळं आणि समाजाच्या अेकंदर जीवनालाच बकाली स्वरूप आल्यामुळं साहित्यांत शिरलेल्या बकालीपणाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीनं न बघतां काल्पनिक संकटाचं पिशाच्च मनापुढं अुभं करून भयग्रस्त आणि संतप्त झालेल्या श्लीलतेच्या कैवाऱ्यांनी आणखी अेक गोष्ट लक्षांत घेण्याची गरज आहे.

माणूस लहानाचा मोठा झाला की त्याची बुद्धि प्रगल्भ होते. लहानपणीं जे विधिनिषेध माणसाला पाळावे लागतात त्यांच्या बंधनांतून तो बाहेर पडतो. साहित्याच्या बाबतीतहि असंच होतं. साहित्याचं वय जसंजसं वाढतं, तसेतसे जुने विधिनिषेध निरर्थक वाटूं लागतात, जाचक ठरतात. पूर्वीच्या काळांत निषिद्ध ठरलेल्या विषयांना हात घालण्याचं स्वातंत्र्य लेखक घेअूं लागतात. कांही गोष्टी फार पवित्र असल्यामुळं त्याबद्दल लिहायचं असेल तर आदराच्या भावनेनंच लिहावं, अुलट कांही गोष्टी चारचौघांत चर्चिल्या जाअूं नयेत अितक्या खाजगी– म्हणूनच लज्जेच्या! – असल्यामुळं त्याबद्दलहि लिहूं नये, अशा प्रकारचा शिष्टाचाराचा दुहेरी दंडक रूढ असण्याचा अेक काळ असतो. साहित्याची वाढ होअूं लागली की शिष्टसंमत जुन्या विषयांची चौकट अपुरी पडूं लागते, नव्यानव्या विषयांचा शोध लेखक करूं लागतो, आणि मग त्याला वाटूं लागतं, ‘अरे, अमुक अेक विषय केवळ शिष्टपणाच्या कृत्रिम खोट्या कल्पनेनं आजपर्यंत अस्पृष्ट राहिला आहे, त्यावर कां लिहू नये? तोहि विषय जीवनाचं अेक अंगच नाही काय? तीदेखील अेक रसयुक्त अनुभूति नाही काय? या विषयावर कथा लिहिली तर कांही लोकांना धक्का बसेल, कांही लोक कथेवर अश्लीलतेचा शिक्का मारतील, परंतु या संभाव्य परिणामाला भिअून मी माझी लेखणी आवरूं? हा रसयुक्त विषय सोडून देअूं? छे, छे! असं काय म्हणून?’ लेखकांची ही वृत्ति बळावते. मग पहिल्या रात्रीच्या अेकान्तांत स्वतःच्या पौरुषहीनतेची जाणीव ज्याला झाली अशा तरुणाचं विचित्र दुःख, प्रसूतीचा क्षण जवळ आल्यामुळं भयभीत झालेल्या, कशाला माझ्या नवऱ्यानं हें संकट माझ्यावर आणलं अशा विचारानं संभोगसौख्य घेअून नामानिराळ्या राहणाऱ्या पुरुषजातीचा मत्सर करणाऱ्या, ज्या संभोगातून मातृपद निर्माण झालं त्या संभोगाला विटलेल्या, आणि तरीहि अपत्यदर्शनासाठी अुत्सुक असलेल्या तरुण स्त्रीची विचित्र मनःस्थिति, दुसऱ्याच्या लग्नाच्या बायकोवर आषक्त झालेल्या पुरुषाच्या मनांतलं विचित्र द्वंद्व, सभोवारच्या तरुणतरुणींत चाललेले प्रेमाचे चाळे बघून स्वतःच्या कायमच्या हरवलेल्या यौवनाचं दुःख करणारा वृद्ध, ज्यावर अपत्यवत् प्रेम करणं अुचित होअील अशा अल्पवयी तरुणाशीं प्रेमसंबंध ठेवण्याच्या अिच्छेशीं झगडणारी किंवा त्या अिच्छेच्या

आहारी जाणारीं चार मुलाबाळांची आओी-- अशा प्रकारचे विषय कथा-साहित्यांत संचार करूं लागतात. सामाजिक जीवनांतील संवादा-प्रमाणंच विसंवादाच्याहि नाना तऱ्हा, रूढ नीतीला अनुसरून होणाऱ्या वर्तनाप्रमाणंच नीतिबाह्य आचरणाचे नाना प्रकार वर्णिले जाअू लागतात. पावित्र्याच्या जुन्या कल्पना आधुनिक विचारसरणीमुळं तत्त्वतः व्यर्थ ठरूं लागलेल्या असतात. ज्या गोष्टी पूर्वी पवित्र मानल्या गेल्या त्यादेखील कलात्मक वर्णनाच्या खुल्या हवेंत आणायला काय हरकत आहे? जें पवित्र मानलं गेलं त्याबद्दलदेखील मनोरंज-नाच्या हेतूनं विनोद करायला काय हरकत आहे?-- अशा वृत्तीनं लेखक, चित्रकार वागूं लागतात. त्यांचं लिखाण आणि त्यांचीं चित्रं बघून कांही लोकांना मोठा धक्का बसतो आणि ते ओरडूं लागतात-- 'सदभिरुचि मेली, ठार झाली! अश्लीलता बोकाळली, बीभत्सता फैलावली!'

या हाकाटीला बळी पडण्यापूर्वी सूज्ञ माणसानी विचार करायला हवा, की अितकं किंचाळण्याचं, झिंज्या तोडण्याचं कारण आहे काय? 'मेनका' मासिकावरील खटल्यामुळं प्रख्याति पावलेल्या अेका व्यंगचित्राचं अुदाहरण घेअू. अेका बाअीच्या स्तनांना अुद्देशून 'दूध-केंद्र' असं चित्रकारानं म्हटलं होतं. परंतु मी खरोखरच विचारतों, यांत येवढं भयंकर असं कय झालं? स्त्रीजातीचा अपमान, पावित्र्याच्या कल्पनेचा चेंदामेंदा, अशी भाषा करण्याचं काय प्रयोजन? अेकंदर स्त्री-जातीबद्दल सद्‌भावना ठेवाव्या हा विचार बरोबर आहे. परंतु हेंदेखील अर्धसत्य आहे. पुरुष जातीविषयी सद्‌भावना कां ठेवू नये? शरीरसौष्ठवाच्या स्पर्धेंत पहिल्या येणाऱ्या पुरुषाचं नग्नप्राय अवस्थेंतील चित्र तुम्हाला चालणार, आणि अुघड्या अंगाच्या स्त्रीचं चित्र मासिकाच्या मुखपृष्ठावर दिल्या-बरोबर मात्र स्त्री जातीविषयी अनुदार बुद्धि दिसली म्हणून तुम्ही आक्रोश करणार होय? हा कुठला विचित्र न्याय?

पुरुष आणि स्त्री दोन्ही पवित्र आहेत. परंतु तितकंच हेंहि खरं, की पुरुषाचं सौंदर्य आणि स्त्रीचं लावण्य दोन्ही पाहण्यांत आनंद आहे. मासिकाच्या मुखपृष्ठावर या सौंदर्याचं दर्शन घडल्यास काय बिघडलं? कुणी साह-जिकच विचारील, की 'पुरुषांचीं चित्रं छापा, स्त्रियांचीं चित्रं कां छापतां?' या प्रश्नाचं साधं रोखठोक अुत्तर असं, की साहित्य-प्रकाशन हा आता धर्म राहिला नाही; अधर्म झाला आहे असंहि नाही, पण धंदा झाला आहे. आणि धंदा कसा, तर ज्यांत स्पर्धा आहे असा. ग्राहकांना ज्या चित्राचं आकर्षण वाटेल असं चित्र प्रकाशकांनी छापलं तर त्यांत कोणता गुन्हा होतो मला कळत नाही. खास अंकावर काय गांधींचीं आणि नेहरूंचीं चित्रं छापायचीं? अेका मासिकानं अेकदा हा प्रयोग करून पाहिला; परंतु तो अंक साफ पडला. राजकीय पुढाऱ्यांचीं चित्रं लोकांना नकोत, त्या थोर व्यक्तींविषयी लोकांच्या मनांत आदर नाही असं मुळीच नव्हे. परंतु आनंदाच्या सणांत मनाच्या प्रफुल्लतेसाठी जे अंक घ्यायचे त्यांच्या मुखपृष्ठावर बाअी पाहिजे असं लोकांना साहजिक वाटतं आणि लोकांची अिच्छा हिशेबांत घेअून संपादक वागतात. अुच्च सदभिरुचीची आणि सोवळे-पणाची धाबळी नेमून वागण्याची ज्या 'केसरी'ची ख्याति त्या केसरीच्या दिवाळी अंकावरदेखील बाअीचं चित्र प्रकट झालेलं आहे! सोवळेपणाचा अखेरचा खंदक शत्रूच्या हातीं गेला अशा विचारानं संस्कृतिरक्षक कष्टी झाले असतील. परंतु निरर्थक ढोंगाचा बुरखा टाकल्याबद्दल केसरीच्या चालकांचं अभिनंदन करावंसं मला वाटतं.

पुरुष आणि स्त्री दोन्ही पवित्र आहेत. परंतु दोन्ही अुपभोग्य वस्तु आहेत हा विचार

कशासाठी लपवायचा? आणि त्याचप्रमाणं स्त्रीविषयी पवित्र भावना ठेवायची हें जरी खरं असलं तरी तिच्या अंगोपांगांचा अुल्लेख करून गमतीची चेष्टा केली तर अेवढा काय मोठा सामाजिक घात घडतो? गंभीरपणानं विचार करतांना ज्या गोष्टी पवित्र मानायच्या असतात, त्यांची विनोदाखातर चेष्टा करण्याचा अुपक्रम मराठी साहित्यांत जुनाच म्हणावा लागेल. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी हिंदूंच्या दैवतांची आणि त्यांच्या सणांची किती चौफेर टिंगल केली आहे त्याचा तुम्हाला विसर पडला काय? आता विनोदी लेखकांची संख्या वाढली आहे. व्यंगचित्रांची गरज वाढली आहे. यामुळं पूर्वीच्या काळांत कोल्हटकरांनी अेकट्यांनीच जें पावित्र्य-विडंबन केलं आणि ज्यावर पसंतीचा व प्रशंसेचा शिक्का लोकमतानं मारला तें मोठ्या प्रमाणावर होत असलेलं तुम्हांला दिसतं येवढंच! ' मनोरंजन ' मासिकाच्या मुखपृष्ठावरहि बायकांचीं चित्रं होतीं. परंतु त्या काळांत मासिकं चारसहाच होतीं. आता दिवाळी अंकांची संख्या दोनशेच्या घरांत आली आहे. त्यामुळं फार बायका तुम्हाला पाहाव्या लागतात येवढंच!

सारांश, 'चालू घटकेच्या साहित्यांत नग्नता वाढली, अश्लीलता फोफावली, बीभत्सता अुतू चालली,' अशा अर्थाची जी ओरड अैकू येते तिच्यांत वस्तुनिष्ठ दृष्टीचा, प्रमाणबद्धतेचा आणि विनोदबुद्धीचा अभाव आहे असं म्हणावं लागतं. नग्नता, अश्लीलता, बीभत्सता या सर्व वृत्तींचा अंतर्भाव करण्यासाठीच ' वकालीपणा ' हा शब्द मी योजलेला आहे. आणि माझ्या मतानं सामाजिक जीवनाच स्वरूपच आज घटकेला अितकं विचित्र झालं आहे, की मराठी साहित्य-सागरांत येअून मिळणारा अेखादा गटार-पाण्याच्या नागझरीचा ओघळ दिसावा हें अटळ आहे. तो पाहिल्याबरोबर आपल्या अुच्च सदभिरुचीची दवंडी पिटण्याची चांगली संधि मिळाली अशा विचारानं किती लोकांनी अुठावं आणि तथाकथित गुन्हेगाराला झोडपावं त्याला कांही सुमार? वसुंधराबाअी पटवर्धन यांच्या 'अंधार' नांवाच्या कथेचा अितका अुद्धार झाला आहे, की त्या कथेपेक्षाहि या अुद्धाराचा अधिक वीट यावा!

मराठी साहित्याच्या प्रगतीचा म्हणजेच गुणवत्तेच्या वाढीचा विचार करतांना साहित्यावर सध्या जी अेक टीका होते त्या टीकेच्या चुकीच्या दिशेबद्दल हें विवेचन करावं लागलं. यांतूनच टीकाकारांच्या आणखी अेका दोषाची चर्चा ओघानंच येते.

सध्या साहित्य-समीक्षेला अेक विचित्र स्वरूप आलेलं आहे. नियतकालिकांचं प्रकाशन हा अेक स्पर्धाप्रधान धंदा झाला आहे या गोष्टीचाच हादेखील परिणाम आहे. नियतकालिकांत साहित्य-समीक्षेचं सदर तर असायलाच हवं; परंतु अभ्यासपूर्ण समीक्षण लिहिणारीं अधिकारी माणसं दुर्मिळ; आणि अधिकारी माणसाकडून समीक्षा लिहून घेण्याअितकं द्रव्यबळ संपादकाजवळ नाही. अशा त्रिदोषांचा जो परिणाम व्हायचा तो होतो. साहित्याच्या प्रांतांत मोठेछोटे गट असतात. या गटांचीं राजकारणं असतात. स्वतःच्या गटांतल्या लेखकाला चढवायचं, जो गटांतला नसेल त्याला खाली खेचायचं, या धोरणापुढं साधनांची शुचिता कुणाला आठवणार? कोणत्या लेखकाचं पुस्तक चांगलं ठरवायचं, कुणाचं टाकाअू ठरवायचं हें टीकाकारानं आधीच ठरवून ठेवलेलं असतं. पुस्तक वाचून नव्हे, तर फक्त लेखकाचं नांव वाचून!

टीकाकारांची ही पक्षपाती गटबाजी अितकी बोकाळली आहे, की टीकेचं महत्त्वच कुणाला वाटेनासं झालं आहे; आणि टीकाकार या महत्त्वाच्या घटकाची प्रतिष्ठाच खलास झालेली आहे. टीकाकारांच्या न्यायीपणावरचा

आणि पात्रतेवरचाहि लेखकांचा विश्वास अुडालेला आहे. ज्याच्या प्रशंसेचा शब्द अुत्तेजनकारक वाटावा, ज्याच्या दोषदिग्दर्शनाचा विचार गंभीरपणें करावासा वाटावा, असा अधिकारी टीकाकार दुर्मिळ झालेला आहे. वास्तविक साहित्यिक समीक्षा म्हणजे साहित्याला वळण लावणारी गोष्ट ठरायला हवी. परंतु तें होण्यासाठी .टीकेचा दर्जा आणि पातळी अुंच राहायला हवी ना? महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे निघणाऱ्या पत्रिकेंतदेखील समीक्षेचा हा आवश्यक दर्जा राखला जात नाही. गटबाज पक्षपाताचे घूत्कार या जबाबदार मुखपत्राच्या पर्णराजींतून अैकू येतात. माझी स्वतःची तर आता खात्री पटलेली आहे, की माझं लेखन बरं-वाअीट ठरविणारं न्यायालय नियतकालिकांच्या कचेऱ्यांत नाही. नियतकालिकांच्या स्तंभांतून अथवा पृष्ठांतून लिहिणाऱ्या टीकाकारांना रसास्वाद घेण्याची अक्कल असते की नाही याबद्दल शंका यावी असा त्यांच्या लिहिण्याचा खाक्या असतो. कथेची, कादंबरीची, नाटकाची सरस-नीरसता ठरविण्याचा अखेरचा जो न्यायाधीश— सामान्य वाचक, त्याचाच अभिप्राय लेखकानं मानावा हें बरं. या न्यायाधीशाचा निर्णय सहसा चुकीचा असत नाही.

सध्याच्या टीकाकारांच्या अेका विचित्र कल्पनेचा अुल्लेख केल्याशिवाय हा विषय संपविनां येणार नाही. 'अमक्या अमक्या लेखकाच्या मर्यादा आता अुघड झालेल्या आहेत' असा शेरा मारून ज्या त्या लेखकाचं नवं पुस्तक निकालांत काढण्याची अेक नवीच रीत आमचे टीकाकार रूढ करीत आहेत. समीक्षेची ही तऱ्हा मला फार अजब वाटते. अमक्याच्या कादंबरीचा किंवा कथेचा साचा ठरून गेला— हा निषेधाचा प्रकार कोणत्या मुलुखाचा? कालिदास कालिदासासारखं लिहितो, भास कवीसारखं लिहीत नाही— हें काय दूषण झालं? सॉमरसेट मॉमनं हेमिंग्वेसारखं लिहावं या अपेक्षेला कांही अर्थ आहे काय? मर्यादा नसतात कुणाच्या लेखनाला? शेक्सपीयरच्या लेखनाला मर्यादा नव्हत्या? टॉलस्टॉयच्या नव्हत्या? गॉर्कीच्या नव्हत्या? निबंधकार चिपळूणकर, लोकहितवादी, केळकर, हरिभाअू आपटे, टिळक, केशवसुत, तांबे, किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी— मराठी साहित्याच्या कोणत्याहि मातबर शिल्पकाराचं नांव घ्या, मी आव्हान स्वीकारून असं सिद्ध करून दाखवीन, की लेखक कितीहि प्रतिभाशाली आणि समर्थ असला तरी त्याच्या लेखनाचा अेक साचा बनतो, त्याच्या मर्यादा अुघड दिसूं लागतात. परंतु ठरीव मर्यादांच्या चौकटींत जें लिहिलेलं असतं त्यांत रसवत्ता नसते म्हणतां काय? असं कसं म्हणतां येअील? ब्रॅडमन ब्रॅडमनसारखाच खेळणार. केसरबाअी केसरबाअींसारख्याच गाणार. रविशंकर रविशंकरसारखंच सतारवादन करणार. आणि तिरुखवाचं तबला-वादन तिरुखवासारखंच असणार! कोणत्याहि कलाकाराचे कांही जन्मसिद्ध आणि कांही परिस्थितिजन्य असे संस्कार असतात. या संस्कारांमुळं त्याच्या कलेवर कांही मर्यादा अटळपणें पडतात. त्याच्या हातून होणारा कलाविष्काराचा अेक साचा ठरून जातो. 'ठरीव ठशाचं' अस म्हणून सवंग टीकाकारांनी कितीहि नाकं अुडवलीं तरी मर्मज्ञ रसिकाला हें ठाअूक असतं, की केसरबाअीच्या प्रत्येक मैफलींत— त्या गायनाची तऱ्हा कितीहि ठरून गेली असली तरी अपूर्व रंगतीची बहार लुटतां येते. विजय हजारेची खेळण्याची तऱ्हा ठरून गेली खरी, परंतु प्रत्येक वेळेस त्याचा ड्राअिव्हचा अेकेक फटका आनंद देतो. आणि याच न्यायानं लेखकाच्या मर्यादा कितीहि अुघड झाल्या असल्या तरी, आणि त्याच्या कादंबरीचा, कथेचा साचा कितीहि ठरल्यासारखा वाटला

सरी, त्याच्या नव्या कृतींत रसवत्तेचा विलास आढळू शकतो.

साचा ठरला, मर्यादा अुघड झाल्या, असं म्हणून अेकेका जुन्या, नव्या लेखकाला निकालांत काढण्याचा काय विचित्र परिणाम होतो त्याचा अेक गमतीदार पुरावा सांगतों. त्या त्या वर्षातल्या सर्व वाङ्मय–प्रकारांचा आढावा घेण्याच्या अत्यंत स्तुत्य अशा अुद्देशानं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पत्रिकेचा अेक अंक निघत असतो. गतवर्षीचा अंक पाहा. कादंबरी, कथा, काव्य, यांचा वार्षिक आढावा घेणारे लेख या अंकांत आढळतील. परंतु प्रत्येक आढाव्याचा समारोप अशा सुरांत केलेला दिसेल, की फडक्यांच्या मर्यादा अुघड झाल्या, मंगेश पाडगांवकर, बोरकर, अिंदिरा संत, विंदा करंदीकर, रेगे यांच्या कवितांच्या मर्यादा अुघड झाल्या; माडगूळकर थोरली पाती, धाकटी पाती, मिरासदार, शंकर पाटील, यांच्या ग्रामीण कथांच्या मर्यादा अुघड झाल्या. फडक्यांच्या कादंबऱ्यांत नवीन कांही अुरलं नाही म्हणून हर्षभराची आरोळी ठोकणाऱ्या गाडगीळ-गोखल्यांच्यादेखील कथासाहित्याच्या मर्यादा अुघड्या पडल्या! सारांश, कमी-जास्त लौकिकाचे सारे लेखक, कवि 'असुनि जिवंतहि मेले!' पत्रिकेच्या ज्या अंकाचा मी अुल्लेख करतों आहे त्यांतील टीकालेखांचं मंथन करून हातीं नवनीत येतं कोणत्या विचाराचं? तर आज घटलेला मराठी साहित्यांत अुघड्या पडलेल्या मर्यादांचीं लक्तरं वाळत घातलेलीं आहेत, झाडून सारे लेखक घाण्याभोवती फिरताहेत, साऱ्याच्या लेखनाचा शिळा चोथा झालेला आहे, जिकडे तिकडे अंधार दिसत आहे, आशेला जागा म्हणून नाही!

किती विचित्र हा निष्कर्ष!

आणि असा निष्कर्ष निघतो याचं कारण काय, तर समीक्षकानं गृहीत धरलेली मूर्खपणाची कल्पना, आणि त्या कल्पनेंतून अुद्भवलेला रसास्वादाच्या बाबतींतला करंटेपणा!

चुकीच्या भूमिकेवरून साहित्यावर होणारी टीका हें माझ्या मनांतलं मोठं शल्य आहे. साहित्याच्या अेकंदर चलनवलनांतला टीकाकार हा अेक महत्त्वाचा घटक आहे. देशाचा राज्यकारभार ज्यांच्या हातीं आहे त्या कारभाऱ्यांची दानत ढासळली तरी हरकत नाही, परंतु जिच्याकडे न्यायदानाचं काम आहे ती न्याय-शाखा संशयातीत असायला हवी. याच न्यायानं साहित्यक्षेत्रांत समीक्षकाची दानत परीटघडीची स्वच्छ असायला हवी. तशी ती झाल्यावांचून साहित्याच्या प्रगतीला टीकेचा जो हातभार लागायचा तो लागणार नाही, हें लक्षांत घेअून यासंबंधांत अवश्य ते प्रयत्न झाले पाहिजेत.

निःपक्षपाती अधिकारी टीकाकार म्हणजे खरं पाहतां लेखक आणि वाचक यांमधला अेक अत्यंत अुपयुक्त असा दुवा आहे. रसग्रहणाची कला शिकविणारा वाचकाचा मित्र आणि गुणदोषदिग्दर्शन करून मार्गदर्शन करणारा लेखकाचा मित्र, अशा दोन भूमिका त्यानं करावयाच्या असतात. प्रत्येक वाचकाला रसग्रहणाची कमीअधिक शक्ति निसर्गतःच असते. म्हणजे प्रत्येक वाचक कांही अंगानं टीकाकार असतोच. परंतु लेखनांतले गुणदोष शोधून पाहण्याची अभ्यासानं कमावलेली खास पात्रता त्याच्या अंगीं नसते. या बाबतींत खास पात्रता ज्यानं कमावलेली आहे अशा टीकाकाराची गरज असते. असा हा टीकाकार रसग्रहणाचं शिक्षण वाचकांना तर देतोच, शिवाय लेखकालाहि त्याचं मोठंच साहाय्य होतं.

आज घटकेला मराठी लेखक अशा प्रकारच्या साहाय्याला मुकलेले आहेत. परंतु या साहाय्यावांचूनहि स्वतःच्या लेखनाची

गुणवत्ता वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करावेत हें लेखकाला समजणं कांही कठीण नाही. साहित्य म्हणजे रसात्मक अनुभवाची देवघेव आहे. देणारा कोण, तर लेखक. आणि घेणारा कोण, तर वाचक. हा मुख्य सिद्धांत लक्षांत ठेवल्यास, साहित्याचा हेतु आणि साहित्याचं प्रयोजन याबद्दलची निश्चित कल्पना ठेवल्यास, अितर कोणत्याहि भ्रामक मताला बळी न पडण्याचा खंबीरपणा ठेवल्यास स्वतःच्या साहित्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी काय केलं पाहिजे याबद्दलचं शिक्षण लेखक स्वतःच स्वतःला देअूं शकेल. कळकळीची अिच्छा मात्र हवी. आपल्याला अजून पुष्कळ शिकायचं आहे अशी नम्रतेची जाणीव हवी. आपल्या आधी होअून गेलेल्या ज्येष्ठ लेखकांच्या खांद्यावर आपण अुभे आहोंत अशी कृतज्ञता हवी. अुत्कट अनुभूतीचा सुंदर आविष्कार ही ज्या अर्थीं साहित्याची अविवाद्य व्याख्या आहे त्या अर्थी नव्यानव्या अनुभूतींचा हव्यास जसा हवा त्याप्रमाणं आविष्काराचं सौंदर्य जास्तींत जास्त साधण्याचे प्रयत्न हवेत. रसनिष्पत्ति करणारी प्रभावी शैली कशी कमावतां येअील याची चिंता हवी. भाषेच्या अभ्यासाचा निदिध्यास हवा. भाषेवर खरंखुरं मनापासूनचं प्रेम हवं.

परंतु या सर्व गुणांकडे बेपर्वाअीनं दुर्लक्ष करण्याची वृत्ति नव्या साहित्यिकांत— कवि, कथाकार, कादंबरीकार, नाटककार या सर्वांत मला आढळते. माझ्या मनांतलं हें अेक मोठं शल्य आहे. साहित्याच्या ज्या व्याख्येचा मीं पुनःपुन्हा हेतुपूर्वक अुल्लेख केला आहे त्या व्याख्येंत 'अुत्कट अनुभूति' आणि 'सुंदर आविष्कार' असे दोन शब्दप्रयोग आहेत आणि दोन्ही सारख्याच महत्त्वाचे आहेत, साहित्याचं जन्मस्थान अनुभूति खरी, परंतु केवळ अनुभूति म्हणजे साहित्य नव्हे. बीजावांचून आम्रवृक्ष वाढत नाही हें जरी खरं असलं तरी नुसतं बीज पुढं करून 'हा पाहा आम्रवृक्ष' असं म्हणतां येअील काय? त्या बीजाचं जमिनींत आरोपण झालं पाहिजे, संवर्धन, संस्करण झालं पाहिजे, अंकुर फुटले पाहिजेत, शाखा वाढल्या पाहिजेत, योग्य वेळीं हिरव्या तांबूस रंगाची कोवळी, मखमली, मृदु अंगाची पर्णराजी आली पाहिजे, मोहोराच्या मंजिऱ्या फुटून आसमंत सुगंधित झालं पाहिजे ! हे सारे संस्कार, सोपस्कार झाले म्हणजेच मधुर, रसाळ फलभारानं लगडलेला आम्रवृक्ष तयार होतो आणि त्याच्या डहाळीवर बसून कोकिळा गायन करूं लागते. ज्यांतून मर्मज्ञ सहृदय वाचकांना रसास्वादाची प्राप्ति होअील असं साहित्य सिद्ध व्हायला केवळ अनुभूति पुरी ठरत नाही. त्या अनुभूतीचा आविष्कार सुंदर रीतीनं झाला पाहिजे आणि तो सुंदर व्हावा यासाठी अवश्य ते अनेक संस्कार मूळच्या अनुभूतीवर झाले पाहिजेत. हा अेकंदर साराच विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्यानं हा विचार डावलला आणि तरीहि ज्यानं साहित्यांत श्रेष्ठ स्थान मिळवलं असा कवि, कथाकार, कादंबरीकार, नाटककार मला तरी माहीत नाही. मोठ्या खेदाची गोष्ट आहे ती ही, की हा विचार मंजूर करण्याचं नाकारण्यांत जिची फुशारकी मारावी अशी आधुनिकता आणि बंडखोरी आहे असं मानण्याची अेक फॅशन लेखकांच्या चालू पिढीत मला दिसते.

सर्वच कलांच्या क्षेत्रांत जुन्या पिढीच्या जुन्या संकेताविरुद्ध बंड करणारी नवीन पिढी साहाजिकच असते. तशी ती असते म्हणूनच कलाविष्काराचा ओघ कधी तुंबत नाही, खुंटत नाही, त्याचा प्रवाह नित्य चालू राहतो आणि प्रवाहित्वामुळं ताजेपणा येतो. तेव्हा नवीनांनी जुन्यांविरुद्ध बंड करावं, कलेच्या जुन्या रीति सोडून नव्या रीतींचे प्रयोग करावे, ही गोष्ट नुसती साहजिकच नव्हे तर स्वागतार्ह आणि अिष्ट समजायला हवी. परंतु ध्येयप्रधान,


72359

प्रगतिकारक बंडखोरी निराळी आणि केवळ 'लालबावटा' मिरवणारी बिनबुडाची अुथळ बंडखोरी निराळी. मराठी साहित्यांतल्या नव्या पिढीची बंडखोरी दुसऱ्या प्रकारची आहे असं खेदानं म्हणावं लागतं.

मळलेली जुनी वाट किंवा चाकोरी सोडून ( Off the beat ) जाणारे जे लोक त्यांना बीटनीक ( Beatnik ) असं अिंग्रजी नांव देण्यांत आलेलं आहे. जुने नीतिनियम, जुने संस्कार, जुन्या रीती, या सर्वांवर या 'बीटनिकां'चा राग असतो; म्हणून अिंग्रजींत यांना 'अँग्री मेन' असंहि म्हणतात. मराठींत आपण 'असंतुष्ट, संतप्त आत्मे' असं म्हणूंया. या लोकांना 'बीटनिक,' 'अँग्री मेन' म्हणवून घेण्यांत अेक प्रकारचं भूषण वाटत असतं. मराठी साहित्यिकांच्या नव्या पिढीत असल्या 'बीटनिकां'ची संख्या बरीच आहे.

चित्रकला, शिल्पकला, नृत्यकला या साऱ्याच क्षेत्रांत 'बीटनिकां'चा संचार होत असलेला दिसतो. अत्याधुनिक चित्रकला व शिल्पकला आणि 'रॉक अेन् रोल' सारखे नृत्यप्रकार म्हणजे संतप्त, असंतुष्ट आत्म्यांच्या बंडखोरीचेच चाळे आहेत. सर्व देशांच्या साहित्यांत नवकाव्य, नवकथा अित्यादि जे प्रकार आले आहेत ते या बंडखोरीचीच फळं आहेत. सगळीकडेच साहित्यांत जें चालल आहे तें मराठी साहित्यांत दिसावं हें क्रमप्राप्तच म्हणावं लागेल. या लेखांत फक्त साहित्यापुरताच विचार करायचा असल्यानं साहित्याच्या क्षेत्रांत जे स्वतःला 'अँग्री मेन' किंवा 'बीटनिक' म्हणवून घेतात त्यांची भूमिका तरी काय आहे बघूया. त्यांचं म्हणणं मुख्यतः असं आहे, की आम्हांला जें कांही सांगायचं आहे तें जुन्या लेखकांपैकी कुणाच्याहि बापाला न सुचलेलं असं आहे. तेव्हा तें सांगतांना जुनं तंत्र, जुन्या रीति, जुने संकेत, जुन्या प्रतिमा या सगळयांची आम्हीं मोडतोड केली तर तें क्षम्यच नव्हे तर कौतुकास्पद ठरावं. आणि दुसरं असं, की कोणत्याहि कलेंत– आणि म्हणून काव्यांत आणि कथेंतहि– आशयाचं खरं महत्त्व आहे. तेव्हा आमच्या काव्यांतील आणि कथांतील आशयाकडे तुम्ही बघा. तुम्हीं बघितलं नाहीत तरी निदान आम्ही बघणारच आणि तंत्राचं किंवा आविष्काराचं सौंदर्य गेलं जहन्नम्मधे अशा वृत्तीनंच आम्ही काव्यनिर्मिति व कथानिर्मिति करणार !

अशा या विचारसरणीचीं माणसं मराठी साहित्यिकांच्या नव्या पिढींत बरींच आढळतात. या गोष्टीचा जो परिणाम व्हायचा तोच झाला आहे; होणार आहे. रसात्मकता हें जें साहित्याचं मुख्य लक्षण त्याचं दुर्भिक्ष्य वाढत आहे, वाढणार आहे. कवितेला वृत्ताची, छंदाची जशी गरज नाही त्याचप्रमाणं विषयाचीदेखील गरज नाही; किंबहुना 'अमुक अेका विषयावर म्हणून जी कविता केलेली असते ती मुद्दाम रचलेली म्हणून कृत्रिम असते–'या चमत्कारिक भूमिकेवरून काव्य केलं जात आहे. कथेला तंत्राची गरज नाही, अितकंच नव्हे तर विषयाचीदेखील नाही– अशा भूमिकेवरून कथा लिहिल्या जात आहेत. कांही कथालेखकांची प्रतिज्ञा तर 'कथेवांचून कथा लिहिण्याची' आहे म्हणतात. या घोर प्रतिज्ञेचं कौतुक करायला कांही हरकत नाही. हळूच प्रश्न विचारावासा वाटतो तो येवढाच, की 'मग स्वतःला कथाकार म्हणवून घेण्याचा तुमचा अट्टाहास कशासाठी ?' मी कायद्याचं ज्ञान संपादन करणार नाही, वकिली करणार नाही, पण लोकांनी मला वकील मात्र म्हटलं पाहिजे अशांतलाच हा खुळचट हट्ट नाही काय ?

बाजारांत नव्या तऱ्हेची साडी आली की महिला-वर्गाकडून तिचं स्वागत होतं. जुन्या तऱ्हांच्या साड्या वापरून थोडा रुचि-

पालट हवासा वाटूं लागलेला असतो. साडीची नवी तऱ्हा केवळ ती नवी म्हणूनच कांही दिवस खपते. नवकाव्य आणि नवकथा यांची चलती कांही काळ झाली. माझी तारीफ तूं कर, तुझी तारीफ मी करतों,अशा स्वरूपाच्या परस्पर सहकारी पतपेढ्या साहित्याच्या 'छापील संसारां'त गटवाजानी स्थापन केल्या असल्यानं नवकाव्याची आणि नवकथेची जाहिरातहि पुष्कळ झाली. 'युगकर्ते' या पदवीला सवंगपणा आला, आणि नवकाव्य आणि नवकथा यांच्या क्षेत्रांत युगकर्त्यांची भाऊगर्दी झाली. अेक वेळ आभास झाला, की जुनं काव्य, जुनी कथा, जुनी कादंबरी हा सारा जमाना कायमचा संपला. आडव्या अंगाची कविता मासिकांत दिसेनाशी झाली. कविता सडपातळ झाली. कृशांगी झाली. अेकेका शब्दाखाली छापलेले सोळा शब्द अशा अरुंद कॉलमाची अवकळा कवितेला आली. जिच्यांत कांहीच घडलेलं नाही, कांहीच सांगितलेलं नाही अशी 'कथा' लिहिली जाअू लागली. म्हणजे काय चमत्कार पाहा! या नव्या क्रोधिष्ट 'बीटनिकां'नी आविष्काराच्या सौंदर्याचे अलंकार तर साहित्याच्या अंगावरून आधी ओरबाडून काढले होतेच, पण आमच्या आशयाकडे बघा असं प्रारंभी प्रतिपादणाऱ्या या लोकांनी अखेर आशयाचीदेखील लाज सोडली, आणि "कवितेला किंवा कथेला कांही आशय किंवा अर्थ असावा लागतो म्हणून कुणीं सांगितलं?' असं विचारण्यापर्यंत या लोकांनी मजल गाठली!

सर्व मूलभूत साहित्यिक मूल्यांचा हा धडधडीत विनाश आहे. साहित्यक्षेत्रांतला अखेरचा निर्णायक न्यायाधीश जो सामान्य वाचक त्याला हें कळतं. आणि म्हणूनच नवकवि आणि नवकथाकार यांच्या वांट्याला औट घटकेचं कौतुक आलं तरी वाचकाची कायमची प्रीति येण्याची शक्यता नाही. सामान्य वाचक ललित साहित्याकडे वळतो तो रसात्मक अनुभवासाठी. ज्यांत आविष्काराचं सौंदर्य नाही आणि अुत्कट अनुभूतीचा गाभाहि नाही, अशा साहित्यांत वाचकाला रसास्वाद मिळायचा कसा? कविता म्हटली की तिला भाव-विभाव हवेत, शब्दसौष्ठवाचे विलास हवेत, नादमाधुर्य हवं, अर्थचमत्कृति हवी, सुंदर चिंतनाचा स्पर्श हवा. अंगोपांगांचं आणि अलंकारांचं हें सारं लावण्य तुम्ही काढून घेणार आणि अुभ्या रेषेंत छापलेल्या सोळा शब्दांच्या हाडांच्या सापळ्याला काव्यसुंदरी समजून आलिंगन द्या म्हणणार, तें वाचकांनी द्यायचं कसं? कथा म्हटली की तिलादेखील असेच भावविभाव पाहिजेत, वर्णनाची रंगत पाहिजे, शैलीची बहार हवी, जिज्ञासा चाळवली गेली पाहिजे, विस्मयाचा धक्का पाहिजे, रसाची चढती कमान हवी. परंतु हें सारं वर्ज्य करून तुम्ही लिहिणार आणि म्हणणार, 'घ्या ही कथा! नव्या तऱ्हेची! नवलाअीची! कधी कुणीं लिहिली नव्हती अशी! युगकर्त्याची! साहित्यांत क्रांति करणारी!'

आशयाची गरज नाही, आविष्काराच्या सौंदर्याची गरज नाही, या भूमिकेमागं कसला हेतु आहे सांगूं? स्वतःचा दुबळेपणा झाकण्याचा. अनुभूतीचं दारिद्र्य, तंत्र-कौशल्याचा अभाव, भाषेचा दुबळेपणा, शैलीचं दुर्भिक्ष्य हीं सारीं व्यंगं झाकण्याचा! रसात्मकता हा जर काव्याचा आणि ललित साहित्याचा आत्मा असेल, तर नवकथाकारांच्या कथांसंबंधी असं विधान करावं लागेल, की त्यांतून रसनिष्पत्ति होत नाही. रसनिष्पत्तीचा प्रयत्नच लेखकानं केलेला नसतो. तो करण्याची ताकदच त्यानं कमावलेली नसते. ज्यांतून चांगली कथा सिद्ध करतां येअील असा 'मसाला' त्याला सापडलेला असतो; परंतु त्या मसाल्यापासून तयार केलेली कथा वाचकाच्या हातीं देण्याअैवजी त्यानं तो 'कच्चा माल'च 'कथा' असं लेबल

मारून 'शो-केस'मधे मांडलेला असतो. नवकाव्याची हीच तऱ्हा. अेका फुटकळ कल्पनेला काव्य म्हणा असा कवीचा आग्रह. त्या कल्पनेवर परोपरीचे संस्कार झाले पाहिजेत तरच ती कल्पना काव्यरूप घेते आणि तिच्यांतून रसाचे पाझर फुटूं लागतात. कथेलाहि हाच न्याय लागू आहे. परंतु या क्रोधाविष्ट 'बीटनिक' साहित्यिकांना ही साधी, सरळ, अविवाद्य गोष्टच मुळी मंजूरच नाही. स्वयंपाकाचं 'साहित्य' निराळं आणि त्यापासून तयार होणारी रुचिकर 'पाकसिद्धि' निराळी, हेंच मुळी यांना मान्य नाही. कणकेचा गोळा, साखर, तूप, केशर, वेलदोडे अित्यादि वस्तु लोकांच्या हातांत ठेवून हे म्हणणार, 'अुत्तम प्रकारचं पक्वान्न तुम्हाला खाअू घातलं की नाही? द्या पावती!'

ही हातचलाखी दीर्घकाल चालण्यासारखी नाही. आता लोकांना समजूं लागलं आहे, की साहित्यांतील नव्या युगाचे हे प्रणेते खोट्या सोन्याचा व्यापार कां करताहेत तर खरं सोनं यांच्याजवळ नाही म्हणून. अनुभूतीची समृद्धि व व्यापकता, तंत्राचं कौशल्य, कमावलेल्या भाषेचं सौंदर्य अित्यादि ज्या गुणांमुळंच साहित्याच्या ठिकाणी रमवत्ता येते, त्या गुणांच्या बाबतींत हीं माणसं दरिद्री आहेत. सामान्य वाचकाला कळू लागलेलं आहे, की या नव्या लेखकांचं कर्तृत्व वीतभर आणि प्रौढीची बडबड मात्र हातभर. साहित्यिकांच्या ज्या ज्येष्ठ पिढीविरुद्ध आणि संकेताविरुद्ध या 'बीटनिकां'नी बंडखोरीचे आवाज अुठविले आहेत त्या पिढींतल्या साहित्यिकानी फक्त निष्ठेनं आणि सातत्यानं लिहिलं, मी यंव केलं, त्यंव केलं असे दावे केले नाहीत. मी केले नाहीत, खांडेकरांनी केले नाहीत, जे अत्रे स्वतःच्या पडशाचीदेखील जाहिरात करीत असतात त्यांनीदेखील असे दावे केल्याचं मला ठाअूक नाही. पण या 'बीटनिकां'ची रीतच निराळी! करणं थोडं आणि बोलणं फार. परंतु सामान्य वाचकाला हें कळतं, की जुन्या पिढींतले लेखक अजूनहि लिहीत आहेत, वाचले जात आहेत, खपत आहेत. 'बीटनिकां'नी निर्माण केलेल्या युगकर्त्यांचीं युगं मात्र अुगवलीं आणि संपलीं-देखील!

मराठी साहित्याच्या प्रगतीचा— म्हणजेच गुणवत्तेच्या वाढीचा— विचार करतांना मनाला शल्य बोचतं तें या गोष्टीचं, की साहित्यांत दुसरा कोणताहि गुण नसला तरी चालेल, पण रसवत्तेचा गुण हवा, या सिद्धान्ताचा विसर पडत आहे. लेखकानं अनुभूति सांगायची हें खरं, परंतु ती नटवून, सजवून, खुलवून सांगायची असते. मूळ अनुभूतींत शृंगार म्हणा, कारुण्य म्हणा, जो कोणता रस असेल तो वाचकांना प्रतीत होअील अशा रीतीनं सांगायचा असतो याची जाणीवच सुटल्यासारखी दिसते. कच्चा माल आणि त्यावर परोपरीचं संस्करण करून अखेर तयार झालेली पक्की वस्तु, या दोहोंतल्या फरकाकडे दुर्लक्ष होत आहे. आशयाच्या अुत्स्फूर्ततेचं महत्त्व मानण्याचा दांभिक अतिरेक अितका होत आहे, की संस्करण म्हणजे कृत्रिमता असा अेक चक्क खोटा सिद्धान्त स्वीकारला जात आहे. आशयावर संस्कार करून त्याची रसवत्ता वाढविण्याचं सामर्थ्य या लोकांच्या ठिकाणीं नाही, तें सामर्थ्य अंगीं आणण्यासाठी यांना कष्ट करायचे नाहीत, ही वस्तुस्थिति आहे. आणि ती झाकण्यासाठी नवमतवादाच्या चादरीचं हें विलायती पांघरूण वापरण्यांत येत आहे. ही चादर अंगाभोवती लपेटणाऱ्यांकडून साहित्याच्या प्रगतीला हातभार मुळीच लागणार नाही. साहित्याची गुणवत्ता वाढणार नाही.

पेन्सिलीच्या अुभ्याआडव्या रेषा, अर्धवर्तुळांचे व वर्तुळांचे गुंतावळे कागदावर काढले तर माणसाच्या आकृतीची ती पहिली तयारी म्हणतां येअील. तो फक्त आरंभ आहे. कच्चा माल आहे. चित्राचं तें बीज आहे. परंतु 'मॉडर्न आर्ट'वाल्याचा आग्रह असा, की

रेषांच्या आणि वर्तुळांच्या या गिचमिडीलाच 'चित्र' म्हणा ! मातीचा गोळा घ्यायचा, तो थोडासा अिकडून तिकडून थापटायचा किंवा संगमरवराचा अेक ब्लॉक घ्यायचा, त्याला थोडासा वक्र अगर गोल आकार द्यायचा आणि 'अुकिडवी बसलेली स्त्री' किंवा 'बाळाला स्तनपान करविणारी माता' अशीं नांवं देअून खुशाल त्यांचं प्रदर्शन मांडायचं! आणि लोकांना सांगायचं ही 'मॉडर्न आर्ट'! त्या थापलेल्या मातीच्या गोळ्याकडे किंवा संगमरवराच्या ब्लॉककडे नीट निरखून बघा, म्हणजे अुकिडवी बसलेली स्त्री तुम्हाला दिसू लागेल, मातेनं बाळाच्या तोंडात दिलेलं स्तनदेखील तुम्हाला दिसूं लागेल! पेन्सिलीच्या फटकाऱ्यांच्या गुंतावळ्यांतूनच योग्य त्या संस्कारांनंतर अखेरचं सुंदर चित्र होणार असतं हें खरं; परंतु तो गुंतावळा म्हणजे चित्र नव्हे! मातीच्या गोळ्यांतून किंवा संगमरवराच्या ब्लॉकमधून अखेरची सुंदर शिल्पकृति तयार व्हायची हें खरं, परंतु तो थापटलेला गोळा किंवा तासलेला दगड म्हणजे अखेरची शिल्पकृति नव्हे! सुंदर तर नव्हेच नव्हे!

या लोकांजवळ नाही संस्करणाचं सामर्थ्य! यांना नको आहे खटपट! यांच्या ठिकाणी आहे कमालीचा आळस! आणि त्या आळसाच्या जोडीला आहे वाचाळता! म्हणून हे खुशाल सांगत सुटले आहेत की Classical Art – कलेची जुनी विदग्ध रीति– ही खरी कलाच नव्हे.लहान शाळकरी पोरं ज्या प्रकारची चित्रं चितारडतात तसलीं चित्रं काढण्यांत येत आहेत, त्यांना चांदीची, सोन्याचीं पदकं देण्यांत येत आहेत. 'Go back to villages' (खेड्यांकडे परत चला) या गांधींच्या घोषणेचाच हा कलाक्षेत्रांतला धुडगूस आहे. या कलाप्रकाराला नांव देण्यांत येतं 'मॉडर्न आर्ट'– 'आधुनिक कला.' परंतु याचं खरं रूप पाहिलं तर ते आधुनिक नसून अत्यंत पुराणकाळांतलं– नव्हे, रानटी काळातलं. ही 'Modern Art' नसून Savage Art आहे! आधुनिक नसून रानटी आहे!

खेडुतांच्या जीवनाला सध्या सगळ्याच कलांच्या क्षेत्रांत भाव आलेला दिसतो. आधुनिक यंत्रप्रधान सुधारणेच्या कांही दुष्परिणामांना माणूस विटला आहे, भ्याला आहे. या भीतीचा अेक विपरीत परिणाम असा झाला आहे, की यंत्रयुगीन संस्कृतीपासून– म्हणजेच नागर जीवनापासून– जास्तींत जास्त दूर जें जें असेल त्याचा त्याचा गौरव करायचा! आधुनिकतेच्या टोकावर आलेला लंबक तितक्याच जोरानं विरुद्ध टोकाला गेलेला आहे. आणि आदिवासी, वन्य जातींच्या चित्रकलेचा, संगीताचा, नृत्याचा अतिरेकी विपरीत अुदोअुदो चालला आहे. या ठिकाणीं लंबक स्थिर होणार नाही हें निश्चित. तो तेथून ढळेल आणि पुन्हा आधुनिकतेच्या बिंदूवर जाअील हें निश्चित. परंतु चालू घटकेला 'फोक डान्सेस', 'फोक आर्ट', 'फोक म्युझिक', 'फोक लिटरेचर' अशा गोष्टींचे नगारे वाजताहेत खरे!

साहित्याच्या क्षेत्रांतहि ही लाट अुठलेली दिसते. ग्रामीण कथांची निर्मिति हा त्या लाटेचाच परिणाम. स्त्री-गीतांचं,अुखाण्यांचं,जात्यावरच्या ओव्यांचं, गोंधळी, वासुदेव अशांच्या तोंडच्या गाण्याचं प्रचंड अुत्खनन चालू आहे. सरकारी मदत मिळते आहे. आंधळे दळताहेत, कुत्रीं पीठ खाताहेत! या साऱ्या गोष्टीचा साहित्याच्या प्रगतीला काय हातभार लागायचा तो लागेलहि. माझ्या मनांतलं मोठं शल्य हें, की साहित्याची रसवत्ता दुर्लक्षित होत आहे. सहजतेच्या नांवाखाली रुक्षता खपविली जात आहे. भाषेच्या सौंदर्याकडे लक्ष देण्याची गरज नवीनांना वाटेनाशी झाली आहे. शैलीचं सामर्थ्य आपल्या लेखणीत आणायला हवं अशी महत्त्वाकांक्षाच नवीनांना नसावी अशी शंका येते.

गाडगीळ-गोखले यांची नवी तरणीबांड पिढी क्रांति करून टाकण्याच्या प्रतिज्ञेनं अेके काळीं कथा-साहित्यांत अुतरली. त्यांची पिढी-देखील आता जुनी ठरूं लागली आहे आणि अैन विशींतली मंडळी पुढं येत आहे. या दोन्ही पिढ्यांतल्या सर्व लेखकांच्या साहित्याचं स्मरण करा आणि मला सांगा– 'शैलीकार' असं ज्याचं वर्णन करता येअील असे किती लेखक या दोन पिढ्यांनी मराठी साहित्याला दिले ?

लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, तात्यासाहेब केळकर, वामन मल्हार जोशी, हरिभाअू आपटे, खाडिलकर, गडकरी, बापूसाहेब माटे, खांडेकर, माडखोलकर, पूर्वीच्या अवतारातले अत्रे या सर्वांची प्रत्येकाची स्वतंत्र प्रकृतीची आणि डौलाची विशिष्ट भाषाशैली होती. प्रत्येकाच्या लेखनांतून तीस-चाळीस ओळींचा अेक अुतारा देअून म्हणतां येअील, की हा पाहा रसात्मक शैलीचा नमुना ! हा वाचा आणि लुटा आनंद भाषेच्या सामर्थ्याचा, साहित्याच्या रसवत्तेचा. जुन्याविरुद्ध बंड पुकारणाऱ्या 'बीटनिकां'चा संचार मराठींत सुरू झाला तेव्हापासून जे कथाकार, कादंबरीकार झाले आहेत त्यांच्यांपैकी किती जणांच्या लेखनांतून असे सुंदर शैलीचे नमुने कितीसे काढतां येतील ?

करुण, वीर, शृंगार अित्यादि रसांचं मुख्य लक्षण कोणतं ? तर त्याचा स्थायीभाव. वाचकांच्या अंत:करणांत भावनेचं नुसतं क्षणिक स्फुरण झाल्यानं रससिद्धि होत नाही. भावनेचा कल्लोळ अुठला पाहिजे भावनेचा अेखादा दुसरा थेंब ठिबकला तर त्याला रस म्हणतां येणार नाही. धार वाहिली पाहिजे. आणि यासाठी काव्यांतली जी बीजकल्पना ती परोपरीनं नटवली गेली पाहिजे. भाषेचा विलास झालाच पाहिजे. परंतु आमच्या नवकवींना नेमका याच गोष्टीचा कंटाळा ! ते फक्त बारा किंवा सोळा शब्दांत बीजकल्पना सांगतात आणि म्हणतात, घ्या हें काव्य ! ते असा विचार करीत नाहीत, की या सोळा शब्दांतून ज्याला रस म्हणतां येअील असा स्थायीभाव निर्माण व्हायचा कसा ? 'राजहंस माझा निजला' या गडकऱ्यांच्या काव्याचं वाचन तुम्ही सुरू करा. अशा कांही चातुर्यानं गडकऱ्यांनी बीजकल्पना फुलविली आहे की अेकेक चरण वाचतां वाचतां तुम्हांला हुंदके आवरेनातसे होतात. करुण रसाचा पूर वाहूं लागतो. अशा सामर्थ्याचं काव्य करण्याची नवकवींची झेप नाही.

**'तूं आलीस तेव्हा तुझ्यापाशी काय होतें ?**
**अगदी पहिल्याने तुझ्यापाशी काय होतें ?**
**तूं आली आहेस म्हणून नोकराणीने मला सांगितलें**
**आणि मी खोलीच्या बाहेर येअून**
**जिन्यावरून तुला जिन्याच्या पायथ्याशी पाहिलें**
**त्या वेळीं तुझ्यापाशी काय होतें ? . . .'**

–सहज हाताला लागलेला रेग्यांच्या काव्याचा हा अेक नमुना.

नवकवींचे काव्यसंग्रह चाळलेत तर तुम्हाला याच मासल्याच्या कविता विपुल सापडतील.

असल्या काव्याचा आणि रससिद्धीचा अर्थाअर्थी कांही संबंध आहे का ?

वृत्त, छंद, प्रास, अनुप्रास अित्यादि बंधनांना 'अडगळ' असं नांव देअून नवकवींनी त्यांची अुचलबांगडी केली. परंतु ही अडगळ फेकण्याच्या भरांत रसवत्ताहि त्यांनी फेकून दिली ! या करंटेपणाला काय म्हणावं ! नवकाव्याचे अितर सारे दोष क्षम्य मानले तरी हा दोष क्षम्य मानतां येणार नाही. कारण या दोषांमुळं काव्याचा गाभाच नष्ट होतो ना !

नवकाव्याला जो त्रुटितपणा आलेला आहे तो रसोत्पत्ति अशक्य करून टाकणारा आहे. आणि हा त्रुटितपणा अुत्तरोत्तर असा वाढतो आहे, की नवकवींच्या कवितांना अुखाण्यांची अवकळा येत आहे. पुरुषोत्तम पाटील यांची ही अेक कविता बघा–

**'चढतीचे अून**
**घाशी गोरी पाठ**
**बाभूळ फुलांचा**
**हळदीचा थाट.**

**लालवण पोत**
**पेटते गळ्यांत**
**कधीचाच ताप**
**हिमानी कळ्यांत !**

**डोहाच्या काठाशीं**
**नजर लागते**
**विघंळून रूप**
**लाट दृष्टावते**

**चढतीचे अून**
**जळी अुतरते**
**गोऱ्या पाठीवर**
**पदर घालते.'**

ही कविता वाचतांना 'समोर होता कोनाडा' अशा अुखाण्यांची आठवण होते की नाही सांगा. 'सोपी आहे तुझी कळ, तुझ्या मांड्यांत मोठें बळ' अशी कांहीशी विंदा करंदीकर यांची कविता वाचल्याचं आठवतं. त्या कवितेंतल्या पांचट शृंगाराविरुद्ध तक्रार करण्याच्या आधी तक्रार केली पाहिजे तिच्या रसहीनतेविरुद्ध ! आणि रसहीनतेचं जें कारण त्या त्रुटितपणाविरुद्ध !

रसनिष्पत्तीला अत्यंत आवश्यक अशा भाषेचीं आणि शैलीचीं वस्त्राभरणं न चढवितां काव्याची किंवा कथेची फक्त बीजकल्पना मूळच्या अुघड्या-नागड्या स्वरूपांत पुढं मांडण्याची त्रुटितपणाची ही प्रवृत्ति म्हणजे अेक प्रकारचा 'नग्नता-वाद'च म्हटला पाहिजे. अितकंच नव्हे, तर अुत्तान शृंगारिक साहित्य प्रसवणाऱ्या नग्नतावादाहून हा नग्नतावाद अधिक भयंकर मानला गेला पाहिजे. कारण संस्करणविरहित अुघडीनागडी बीजकल्पना काव्य किंवा कथा म्हणून मिरवली जाते, या गोष्टीमुळं साहित्याची प्रगति खुंटते. नवे शिकाअू साहित्यिक असं मानूं लागतात, की साहित्याला रसवत्तेचीं गरज नाही, शैलीची गरज नाही, सुंदर भाषेची गरज नाही, व्याकरण-शुद्धतेची नाही आणि सुंदर हस्ताक्षराची तर मुळीच नाही. चार ओळी लिहिल्या की काव्य सिद्ध होतं; दोन चतकोर पानं लिहिलीं की कथा सिद्ध होते. साहित्याचे सर्व प्रकार लांबी-रुंदीनं कसे आक्रसले आहेत पाहा ना ! कथांचा सुकाळ झाला आहे, परंतु नवा कादंबरीकार शोधून काढावा लागतो. पूर्ण लांबी-रुंदीची कादंबरी तर दुर्मिळ झाली आहे. गेल्या दिवाळींत अेका संपादकांनी आपल्या खास अंकांत तीन कादंबऱ्या दिल्या होत्या. प्रत्येक कादंबरी होती पंधरा किंवा वीस पानांची. लिहायचं छोटं कांहीतरी आणि त्याला नांव मात्र द्यायचं मोठं ही प्रवृत्ति वाढत आहे. कथा-लेखकांपेक्षा 'पान-पूरकं' लिहिणारांची संख्या वाढत आहे. कोपऱ्यांत सहज सामावणाऱ्या कविता लिहिणारांची संख्या वाढत आहे. या विचित्र प्रकाराला साहित्याची प्रगति म्हणायची काय ? साहित्याच्या गुणवत्तेची वाढ झाली असं म्हणतां येअील काय ?

लेखकांच्या नव्या पिढीविषयी लिहितांना आणखी अेक शल्य सांगावंसं वाटतं. साहित्यांत क्रांति करावी, कांहीतरी नवं कोरं करकरीत करून दाखवावं, लौकिक मिळवावा ही अिच्छा वावगी कोण म्हणेल ? परंतु आधी होअून गेलेल्या लेखकांच्या लौकिकाचीं अुंच झाडं तोडलीं तरच आपल्या कर्तृत्वाचं खुजं

झाड अुंच दिसेल, ही वृत्ति घातुक आहे. नव्या अुत्साही महत्त्वाकांक्षी लेखकानी हें लक्षांत ठेवावं, की ज्या मराठी साहित्यांत ते पाअूल टाकीत आहेत त्या साहित्याला आठशे-हजार वर्षांची परंपरा आहे! मोठमोठ्या मातबर सारस्वतांच्या कित्येक पिढ्यांच्या पराक्रमांनी तें साहित्य घडलेलं आहे. अेकेक असे थोर कवि, नाटककार, कादंबरीकार होअून गेले आहेत, की त्यांच्या लेखणीपुढं मस्तक नम्र झालंच पाहिजे! या सर्वांच्या खांद्यांवर आपण अुभे आहोंत. त्यांनी जो वारसा आपल्या हातीं दिला आहे तो मोलाचा आहे! तेंच आपलं धन आहे! त्या संचयांत आपल्याला घालतां आली तर भरच घालायची आहे. ती घालण्यासाठी अुथळपणाचीं सारीं मतं टाकलीं पाहिजेत. मराठी साहित्याची रसवत्ता वाढविण्यासाठी झटलं पाहिजे! भाषेविषयी प्रेमादराची अशी भावना हवी, की निष्काळजी, अशुद्ध लेखनाची जखम मी तिला कधी करणार नाही! स्वत:चं भाषाप्रभुत्व वाढविण्याची जिद्द बाळगली पाहिजे. ज्ञानेश्वरांच्या ओवीपासून तों सगनभाअूच्या लावणीपर्यंत जिथंजिथं जें जें सौंदर्य आणि सामर्थ्य आढळलं तें तें वेचून आणि पचवून स्वत:च्या भाषेचा आणि शैलीचा मधुर अुन्मादकारी अर्क ज्या गडकऱ्यांनी बनविला त्यांचं अुदाहरण फारसं जुनं नाही, नवंच आहे. त्यावरून योग्य तो बोध घेण्याची तयारी ठेवायला हवी!

असं झालं तर मराठी साहित्यावर सध्या जें 'दुरिताचं तिमिर' पसरूं पाहात आहे तें नाहीसं होअील आणि मराठी साहित्याच्या हितचिंतकांपैकी 'जो जें वांछील' त्याला तें मिळेल!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३५२४७३ दि.
वर्ग ...
REFBK-0012341
ग्रंथ संग्रहालय
ता. क्र. 12348

# आमचीं तीन नवीं प्रकाशनें

## अिंद्रधनूचा पूल

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून घरोघरीं आवडीने वाचली गेलेली कै. पिरोज आनंदकर यांची 'स्त्री' मासिकांतून प्रसिद्ध झालेली लेखमाला. वयांत येणाऱ्या तरुण मुलींना अुद्देशून लिहिलेल्या ह्या पुस्तकाला मराठी भाषेंत दुसरी तोड नाही.

मूल्य : ४ रुपये. ट.ख. सह रु. ४.६४

## कौटुंबिक हितगुज

श्री. वा. काळे ह्यांनी अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या व 'किर्लोस्कर' मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या ह्या लेखमालेने हजारो वाचकांच्या मनाची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख ह्या संग्रहांत अेकत्रित केले आहेत.

मूल्य : ३ रुपये. ट.ख. सह रु. ३.६४

## नव्या दिशा

'किर्लोस्कर' मासिकाने आपल्या ५०० महिन्यांच्या जीवनांत वैशिष्टयपूर्ण आणि विचारप्रवर्तक असे जे शेकडों लेख प्रसिद्ध केले त्यांतील अत्यंत महत्वाचे आणि प्रातिनिधिक स्वरूपाचे लेख निवडून त्यांचा हा अभिनव संग्रह ५०० व्या खास अंकाच्या निमित्ताने प्रसिद्ध केला आहे.

किंमत ५ रुपये. ट. ख. सह रु. ५.८७

किर्लोस्कर प्रेस (प्रोप्रा. किर्लोस्कर ब्रदर्स लि.)
स्वार गेट, पुणें २.